म. ग्रं. सं.
विषय काव्य
सं. नं. १५८
सन १८६९

४०

काव्य

म. ग्रं. सं. ठाणे

विषय
काव्य

ालय क्रमांक
१५८

लेखक म. मो. कुंटे

सन
१८६९

पुस्तकाचें नांव राजा शिवाजी नावाची
कविता भाग १ ले ३.

नं
३६७

सं. कोठरी

३८९

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ३६८०
स. ग्रंथ. ३८४

# राजा शिवाजी

नांवाची

वीररसप्रधान कविता

महादेव मोरेश्वर कुंटे, बी. ए.
कोल्हापूर येथील हाय स्कूलचे हेड मास्तर
ह्यांनीं रचिली.

तिच्या एकंदर बारा भागांपैकीं

## भाग १-२.

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिस्तर केलें आहे.

मुंबईत
इंदुप्रकाश छापखान्यांत छापिलें.
१८६९.

## PREFACE ERRATA.

| | *page* | *line* |
|---|---|---|
| Omit "the"................. | 21 | 2. |
| Read "guided" for "guarded". | 27 | 16. |

---

## कविता शुद्धिपत्र.

| शुद्ध. | अशुद्ध. | पत्र. | ओळ. |
|---|---|---|---|
| चाळे .... | चाले .. | ६४ .... | १३ |
| घोडा .... | धोडा .. | ७२ .... | ६ |
| जोर ..... | जार ... | ७७ .... | ६ |
| थोर ..... | भोर ... | ८६ .... | २ |
| थोर ..... | भोर ... | १३६ .... | ६ |
| तेजामधें .. | ते जामधें. | १३६ .... | ८ |

# PREFACE.

I MAKE bold to lay the first three books of my poem on Shiváji before the public. It is undoubted that the public is seldom erroneous in its judgment. It is fair, therefore, to abide by the popular opinion. But it is necessary, that the public may come to a correct conclusion, to acquaint it with all the facts and circumstances connected with what is brought before it. This I will proceed to do in a short sketch.

The definition of a poem and the circumstances under which it is applied.

2. Poetry, in the largest sense given to it, is that which charms the feelings without offending the understanding.* It is essential for every poem to conform to this definition, and fulfil all the conditions it embodies. But its success depends upon the taste and feelings of its readers. And the

* This definition appears to some to be vague. But it is, I believe, a correct definition of poetry or the poetic.

feelings or taste may be refined, pure, hypercritical, or vitiated in the case of a nation as well as of an individual. And a work of art of this description may not, therefore, be properly appreciated. Hence, when a book is condemned, it may be either that the book abounds in defects, or that the opinion of critics determined by their education and prejudices, is at fault. I admit that there may be serious defects in my performance; that it may fail to be interesting; that some of the statements it makes, may be unfounded; that the pretensions it advances may deserve rebuke at the hands of the public; and that the author may be deluded. I am prepared to bear the criticism of the public with patience and fortitude. But with the consciousness of having done all that I am capable of, on my mind—I might be excused for indulging in a few remarks with regard to the taste of my countrymen.

The taste of the Maráthás.

3. The inhabitants of Maháráshtra, including Bráhmans, Shúdras, and others, may be divided into three classes in reference to their taste. (1.)—The Shástrís and those

whom they really guide. This class is large. (2.)—The educated, that is, those who know English. (3.)—The uneducated; especially those who are indifferent to the Shastris or the educated, and who follow what their instinct prompts, and delight in what their nature likes. More of each in the sequel. (1.)—Our Shástrís have doubtless exercised important influence on the literary taste of our countrymen; nor is their education contemptible. There is in Sanskrit a complete system of formal logic in the sense attached to this expression in Europe. They study this with diligence and care, and their power of framing definitions too accurate to be practical, and too concise to be easily intelligible, is astonishing. They read the Rámáyaṇa and the Mahábhárata; also the poems of Mágha, Kiráta and Naiṣhadha. The first and the second can successfully vie with Homer's Iliad and Virgil's Æneid. The others are works of art in which such literary contrivances as alliteration, *sleṣha* (expressions admitting of two or three meanings), harmonious versification, elegant and apt metaphors, almost predominating over sense and over-

powering the understanding—are plentifully used. There is in these enough of excellent Sanskrit literature to enable our Shástrís to be acute critics. But their taste is affected. Instead of waiting to see how one large general sentiment is developed; and how general arguments and remarks are brought to bear on the evolution of a particular feeling, they expect something artistic in every couplet; and they look for excellence and interest in the elementary subordinate ideas rather than in the combined effect. They also draw a broad line of demarcation between the Purá̤ṇas and poems. The former are the Rámáyaṇa and the Mahábhárata which are supposed to be above human imitation, the latter are Kiráta, Mágha, and others of which I have already spoken. I believe the times are altered now. It is too late to attempt to write a poem on the model of Kiráta or Naishadha. As master-pieces of art, they are almost unrivaled; but of an art which is not inspired by nature and which does not imitate it but which is opposed to it. The whole is too dazzling and gorgeous to be natural. (2.) Next to the Shástrís in

numerical strength but far superior to them in intelligence and in such power as intelligence imparts, come our educated countrymen. Their taste is improved; their understanding is enlarged; their judgment is generally correct and formed after consideration; and their minds are free from prejudices. They are, therefore, properly qualified to be judges. But there are certain circumstances which prevent this. They admire what deserves admiration when they read English; but as soon as they take up a Marathi book they are out of humour. Accustomed to read English, thoroughly sensible of what English poetry is, and competent by their education to enter into the feelings of English authors, they find almost no difficulty in discovering beauties and in interesting themselves. But such is not the case with Marathi; though it be their vernacular. Here they find raw materials, uncouth expressions and a versification to which, perhaps, their ears are not accustomed. A Shástrí does not consider a poetical line to be tolerable, till it is considerably stuffed with Sanskrit words; for pure Marathi grates upon his

ears. Here there are two facts—the fact that the educated do not find Marathi tolerable, and the fact of the Shástrís looking down upon it. Nothing is common to these two classes except that they do not labour at Marathi and cultivate it; but that they look at it either from a Sanskrit or an English point of view. Hence this want of appreciation arises from the want of cultivation. This is not all. Our educated countrymen are too few for the public services and for the professional careers that are open to them now. They cannot afford time, perhaps, to look into Marathi books. It is true that some have written Marathi poetry. Though these gentlemen belong to a new and an original school, founded on the model of English writers, when they write prose; yet as poets they strictly and ambitiously tread in the footsteps of Moropant or Váman, degenerate Sanskrito-Maráthi poets, towards imitating whom all their attempts have been directed. They are not to blame. Perhaps, they cannot help this. Their *padas* and *sákis* which are well adapted to the lyrical style of poetry are, however, genuine Marathi

pieces to a very great extent. But it is when they write *Shlokas* or *Aryás*, metres, I humbly believe, well adapted to the heroic or any similar style of poetry, that their style is crippled; and that Sanskrit words are indiscriminately introduced. The original forms of words are altered and contorted. Lines after lines are so arranged that the meaning is not intelligible even though they be often read over carefully. The writers of such verses have brought into vogue the system* of explaining the difficult words used by themselves in foot-notes. I am not against Sanskrit words because they are Sanskrit words. But a Marathi author is warranted to use Sanskrit words only when there are no Marathi words to express the same sense. On examining the foot-notes of most of the Marathi translations of Sanskrit dramas, it will appear that Sanskrit words are used where appropriate Marathi words can be had. I do not find fault with them, for they

---

* Some Sanskrit authors have written commentaries on their own productions. This strange practice has been, it appears, revived. But it does not bid fair to be successful as the common people, even with the aid of the foot-notes, fail to understand a poem.

are pioneers. As first fruits of a rich harvest yet to be reaped, they deserve attention. Besides, however awkward his gait may be, however slow his motion, one who walks, is certainly to be preferred to him who sits still, and magniloquently advises others to achieve what he himself cannot. (3.)—The uneducated including farmers, labourers, and artisans, are out of the question. Yet the uneducated in Maháráshtra are not a herd that can be easily led. Because they have resisted the influence of the Mahomedan civilization and of the Sanskrit civilization, and because they have retained amidst political revolutions and religious transitions, their peculiar feelings and taste, they deserve to be considered here. Marked by the peculiarity of using brute force, and the exclusive and systematic devotion to one God, and backed by imperial authority from Delhi, the Mahomedan civilization about the end of the 14th century, began to domineer. In the Panjab, it at once conquered the old Hindu civilization. The system of *Sikhism* as expounded in the two *Granthas*, is a thorough reflec-

tion* of Mahomedanism. The *Guru* is a substitute for the Prophet; the *Grantha* supplies the place of the Koran. The Thikáná or Akálbhungá exactly corresponds with the Mosque. Nor does the Sikh differ much from the Mahomedan. The feeling of reverence for the "sacred cow" and the "inspired Vedas" are totally extinct. So also in the Central Provinces and in the Gangetic plain, the Mahomedan civilization succeeded in subverting the old Hindu civilization. Bengal adopted the Zenana system. The writings of Kabira equally condemn or commend Mahomedanism and Hinduism. Equally long and close as the contact of the Marathas with the Mahome-

* The Sikhs fought with the Moslems. They originated in opposition to them; yet they imitated the Mahomedans. These two assertions appear to be contradictory. But an examination of their system discovers many points of resemblance and leads to the assertion I have made. The *Grantha* of Nánákshàh is full of metaphysics and Vedántical disquisitions. That of Govind Sing is practical and contains the germs of the system as it afterwards grew up. The Atmaprakásh is philosophical; but the Tanakhánámá is full of injunctions based on opposition to the Moslems. Thus there are two sects—the Shikhs of Nának, and the Sings ot Guru Govind.

dans was, they escaped* the influence of Mahomedanism. This is a very important circumstance. The lower Marátha is pious in his own way, worldly in his own way, and diligent in his own way. Though he thus appears to be stubborn and conservative, yet he is liable to be moulded by proper influences. Master of that sarcasm which springs from feelings of pious indignation, Tukáráma inculcated upon him the doctrine of "justification by faith and the necessity of the purity of heart for securing salvation."† Gradually the whole lower Marátha population has learnt to follow his tenets. This shows what the susceptibilities of the Maráthás are.

The school of Science and the school of Literature.

4. Those who cultivate science are imagined to be opposed to those who cultivate literature. It cannot be said that really scientific men are so disposed. But a contest

---

* The lower Marátha, it is true, revels and is frantic and wild during the Mohorum holidays. But he has thus adopted the form and not the spirit of a Moslem holiday. He possesses superabundant physical energy; but as it is not applied, he lets it out in ways unreasonably wild but natural enough.

† Vide. भावें गावें गीत शुद्ध करोनियां चित्त, जरी तुज व्हावा देव तरी हा सुलभ उपाय.

carried on by the advocates of the Classical languages, gives grounds for belief, that the ends of science are different from those of literature. But nothing can be a graver mistake. Civilization, if defined from a utilitarian point of view, would be that state of society which secures for it the maximum of comfort with the minimum of the waste of means. In other words, civilization lessens human sufferings, alleviates human pain, and actually increases the stock of human happiness. But human comfort is an expression which includes a great deal. It means the comfort of the whole man with his animal propensities, his desires, his appetites, his affections, his intellect, and his imagination, his natural philosophizing tendencies, his feelings, and his religious aspirations. Science employs the understanding and the reasoning faculties of man, and increases his dominion over nature. It, perhaps, enlarges the ideas of man with regard to the earth and skies and through this, acts on his feelings. But this is a limited field. Hence, all that science does is to operate on a small portion of human

nature and to benefit it. Classics and literature soothe his feelings, humanize them, elevate the understanding, and purify them all. Both science and literature, therefore, are important agents in conducing to the comforts of man. And the development and growth of both together constitutes civilization. Hence in the state in which we are, an original school of poets is as important as a school of physicists. As mathematicians, as chemists, and as physicians, we are behind England; but because it is so, there is no reason why we should be daunted. That time may be at hand when we may overtake England. The same holds true of poetry. It is necessary that schools of poetry and sciences should be formed. To talk of all that Buckle writes, and of all that Mr. Mill aspires after, would not do for us.*

* Vide "Native Opinion" of the 28th September 1868. It is all for science and art, and against poetry. Vide also in "The Bombay Educational Record" for October, Sir A. Grant's speech in which he alludes to the discussion between the school of science and the school of poetry.

5. At best the school of scientific men cannot but be esoteric. The scientific men and philosophers in a country cannot but be few. Their influence, unless spread abroad, will be confined to themselves; for, their books cannot be read by the uneducated, for, an ordinary man engaged in the affairs of the world, cannot spare time, and does not possess abilities, for conducting a scientific investigation. Thus in a country where popular literature, easy, energetic and full of thoughts, which deals with the intellectual, moral and animal aspirations of man, does not exist, the lower classes are separated from the upper by a great gulf. Vedántism is a system, learnt and followed in closets, because it wants a popular literature. So long as such a gulf exists, so long as the whole nation is not animated by the same feelings, and filled with the same aspirations, social, religious, and political degradation must be the consequence. When Shivaji flourished, the feelings of common sympathy were developed and the national chord of the Maráthás was touched. Tukárám, the

The great Gulf.

great representative of the common people, flourished. Hence, apart from importing western science and art, the creation of a school of poets, who can popularize high thoughts and entertain popular feelings, and encourage the growth of that sympathy, which elevates the lower classes, and humanizes the upper and the richer ones, is essential. This, I humbly believe, is the only way in which the great gulf can be bridged over.

* Negative Criticism.

6. Negative Criticism is indefinite and endless, but transiently injurious to authors. Negative criticism requires to be distinguished from positive criticism. The former arises from ignorance and vanity; the latter, from knowledge and large-mindedness. The one raves and seeks demolition, and the other sticks to the point and encourages construction. The first can be managed by any body. The last a real critic alone can do.

An epic what?

7. Some time ago, I wrote a short poem. It was shewn to a body of critics. Its

* This expression has occurred to me in the writings of Dr. Johnson.

nature was not understood. A metaphysical satire was mistaken for a dramatic poem. Hence, a great deal of criticism, wide of the mark, was passed. To prevent the recurrence of this, I find I must needs enter into detail and show the class to which this poem belongs. It is an epic which differs from a drama, whether a tragedy or a comedy or a mixture of both, a lyric, a descriptive rambling poem which has nothing special about it, or a pastoral. A drama seeks to evolve one particular sentiment. It may be merriment; and it is a comedy. It may be sorrow; and it is a tragedy. Sometimes a tragedy, it is true,* is defined to be the situation of a hero in those artificial circumstances to which he succumbs. On the contrary, a comedy is said to consist in the development of the circumstances over which a hero triumphs. Again a drama is founded on a part or the whole life of an individual. A lyric refers to a particular action. The rest speaks for itself. Now, the most important elements in an epic are:—it applies

* These definitions, I remember to have read in some Review or Magazine.

to the origin,* growth, and end of a whole nation, and includes the development of all sentiments, from the affectionate which is seen in the inner recesses of a home to the marvellous which is unlocalized and indefinite. Its descriptions range over all natural scenes. In short, it is an embodiment of all that a nation is. Sometimes the heroic predominates and sometimes all actions described seem to refer to a particular hero, and to revolve around him. But this is just a delusion. In such a case, the heroic or the hero is co-extensive with a nationality and as such includes every thing. It is plain that, if a poem of this description were tried by the rules of a drama, it would fail to be satisfactory. But this would be absurd and preposterous. It would be enforcing the Penal Code in a civil court. How far I have succeeded in developing this epic, is a question which the public is in a position to answer. I intend this, however, to be an epic.

* Aristotle's definition:—"that which has a beginning, a middle, and an end."

8. The ambition of the author is to paint the feelings as they were evolved at the time of Shivaji. Oppressed by the Mahomedans, the Marathas had gone mad. Their temples were demolished. Some of them were forcibly circumcised; their religious feelings were outraged in the Durbar Hall and on public streets. Their leaders were mercilessly imprisoned or killed. From these circumstances, the feeling of opposition to the Mahomedans had become so strong among them that they were almost instinctively impelled to consider the Mahomedan as a pious Christian considers Satan. But Satan is invisible. His mischiefs are done clandestinely. The Mahomedan could be seen, devising new plans for enslaving the Marathas, looking down upon him with supercilious contempt, often annoying him into abject submission, and as often endeavouring to destroy his nation. Enraged, the whole Maratha* population flew to

The ambition of the author.

* This might appear to some too strong. But it is borne out by facts in the life of Shahaji, the father of Shivaji, and by the conduct of the Bijapoor Government towards the old Maratha houses. The Bijapoor Government was not so liberal in its policy as the Imperial Government of Delhi.

arms spontaneously and simultaneously. They proposed to themselves no political ends ; they never thought of establishing a kingdom. Their ambition did not extend beyond wreaking vengeance on their oppressors. Angry with their national gods, who, they inferred, had forsaken them, and disposed from despair almost to think out the philosophy of Tukárám, they considered it their duty, their religion, and their existence to expel the Mahomedans from their country. Thus two causes operated :—the religious and political distresses of Mahárásthra. But the religion of the Maratha consisted in ennobling feelings of piety and resignation :—a piety which awakened in him feelings of indignation at the sacrileges of the Islams, and was active in rendering him sensible to his personal and national sufferings ; and a resignation which did not make him a Vedantist, a fatalist ; but which had all the dignity and sensitiveness which faith in the power of God and hopes beyond the grave impart. This might appear to some a gross exaggeration. But a careful study of the

times under consideration amply warrants the language I have used. The history of Shivaji cannot be studied from Elphinstone's History or Murray's British India. It requires to be studied from Rámdása's writings and Tukárám's utterances. The deeds of Shivaji, the founder of the Maratha Empire, and an embodiment of the genuine Maratha feelings such as had grown up at the time, require to be considered, along with the feelings of his preceptor and of Tukárám, which have since become the religion of the lower Maratha population. The piety of the Maratha, his wordliness, his politics, were generally influenced by his opposition to the Mahomedans, a sentiment which predominated, and which is a key to the historical analysis of the times. I have, therefore, given it such importance in this poem as I have thought necessary. It may be urged with plausibility that a book written under circumstances, such as my poem is, necessarily tends to produce the feelings of enmity between the Mahomedans and Hindus, who form two important sections of the community in Mahá-

ráshtra, and that this mischievous end is by no means desirable. But such an objection is raised by those who do not understand what human nature is and how it works. Because Macaulay justifies Cromwell, regicides should be produced in England. Because a history of the Reformation which condemns the Papists, is read in a school, therefore the Protestant boys should rise against their Roman Catholic school-fellows*. This reasoning is contradicted by facts and the "logic of facts" deserves preference. Feelings of enmity always spring from actions of enmity. If the latter be wanting, the former do not exist. The Mahomedans and Hindus are friendly, because time has taught them to tolerate each other. Let this equilibrium be destroyed and the two, in spite of books advising them to be kind and friendly, and in spite of all inducements, political and social, and in spite of imperial patronage, will soon learn to hate each other.

---

* Protestants, Eurasians, Indo-Britons, and Portuguese Roman Catholics often belong to the same class, and are friends in many of the schools in Bombay.

9. The existence of two sorts of style is recognized:—the Romantic and Classical.

Style.

Perhaps, this division has a foundation in nature. Art, when it imitates nature, *i. e.*, is not opposed to it, is true art. But when it seeks to produce a certain effect by intensifying and by exceeding nature, it should cease to be called art. The style derived from this description of art is what I mean by an artificial style, which corresponds with what is called the Classical style. The style which keeps close to nature is natural or Romantic. This division can be distinctly seen in Sanskrit as well as Marathi writings. The Rámáyaṇa and the Mahábhárata, epics of old, and the writings of Kálidás—these belong to the first class. So also the *Abhangas* of Tukáráma and the writings of Rámdása. But most of the *Panch Kávyas* and the *Champùs* in Sanskrit and the *A'ryás* of Moropant belong to the second. I must needs attach great importance to this two-fold division, for the Classical style prevails to the exclusion of every thing else in Maharashtra as far as poetical compositions are

concerned. The taste of our people, as I have already observed, is entirely regulated by our Shastris, and our Shastris condemn whatever does not implicitly follow their Champús and Kávyas. The taste of our educated countrymen is difficult to be judged of. They live in the atmosphere of Mill, Hallam, and Shakespeare, the highest literary and scientific men of England whose spirit is, perhaps, superinduced upon them. They are, therefore, very great critics. But if one were to judge from the few translations which are attempted by Poonah scholars, in spite of himself, he would have to recognize that the Classical style is preferred. So when one writes a poem in natural Marathi—such Marathi as is spoken in our towns and villages—the prose Marathi—the Marathi of the populus Vulgus, he should be prepared to meet opposition and condemnation; for, the notion still prevails that because a poetical line composed exclusively of pure Marathi words, is extremely unmusical; therefore, poetry should not be written in pure Marathi; but as many Sanskrit words should be introduced as

a line can bear. The premises are based on a fact. But they do not warrant the conclusion that is drawn from them. It is not pure Marathi words that are at fault but the system of quantification now in force is irregular and unnatural. Marathi words are not written as they are pronounced. For instance no body pronounces उचळून as consisting of four full syllables, but च् is only a consonant and is amalgamated with उ, which therefore, becomes long by position. So long as this difference between Marathi written and Marathi spoken is not removed, or at least recognized ; so long as some innovation founded on the knowledge of this difference is not introduced ; the cause of metrical Marathi composition should suffer. Aware of this, I fearlessly adopted the method of writing words as they are spoken, in my poem. So the reader will find खाळ्चा instead of खाळचा, which is really unmusical. For this alteration, I know, I might be taken to task ; but I derived some consolation when, some time ago, I saw that the same question was mooted in one of the numbers of the "Vividha Dnyána

Vistárá" and the subject of Marathi quantification was discussed ; for I then thought that some educated gentlemen would thus be on my side. Again if pure Marathi words were largely introduced into poetical compositions, writers would be exposed to the opposite danger of using vulgarisms. This is, to a certain extent, reasonable, and vulgarisms should be avoided by all means. I have not put here a mere supposition. An educated critic actually favoured me with a list of what he considered to be vulgarisms. If tried by his standard, the greater portion of the Marathi language would have to be proscribed. But certainly a word, as such, cannot be vulgar or otherwise. It is the sense of a word that requires to be considered. A vulgarism, therefore, may be defined to be a word or an expression which conveys heinous, obscene and nauseating sense. I assure the reader that I have always taken great care to avoid such vulgarisms. If this definition were not recognized, the charge of using vulgarisms could be brought against almost every writer. I ought to be prepared,

therefore, to submit to what is the lot of almost all.

The fable, the plot or the story.

10. The fable, the plot, or the story is the first thing of importance in a poem; for the essence of true poetry is invention, and also an arrangement, originating in it and resulting in enabling the mind to rise above itself. A poet is not a histriographer; his business is not to give a narrative. What he sees in nature—whether such things as are discovered in human feelings, and aspirations, that is, the inner nature, the world of the mind, or such things as can be observed by the eyes, that is, the external nature, the world of mountains, rivers, and the stars and the firmament, a poet seeks to combine, and by means of this, to produce new pictures. Hence, the development of the story deserves consideration. But those critics who are ignorant of this art, quarrel with such things as are decidedly of minor importance. For instance, I have been asked why I have not commenced my poem with the early life of Shivaji, and why I should open it with the description of the Panhalla Fortress.

The reason is plain. I believe, that the one would have made my poem a *povádá*; and the other might make it an epic. Of course, this circumstance is nothing in itself, but if what follows in the poem be in keeping with the beginning, the result would be what I have indicated. I have sketched out a complete epic in twelve parts. This book gives three parts only. Hence, all that the reader will find in this book, will be the epic commenced. In the first part, the nationality of the Marathas with some of their characteristics is given; and Shivaji is introduced. In the second part, a portion of the private life of Shivaji is described and the way in which the Marathas carried on their politics is hinted at. And in the third part, the Marathas surprise the Bijapore Mahomedans at the bottom of Panhalla. For all this, the history of Shivaji is not the basis; but circumstances founded on the national manners are carefully put together. A great deal of the way in which the Marathas planned and acted is still preserved in ballad songs, in traditions, in domestic stories, and in the stories

which our *Gadkaris* so fondly relate. This will give something of the external worldly life of the Marathas. The writings of Rámdás and Tukárám will throw considerable light on the inner moral life. These are the materials which I mean to work up. I present the first three parts to the Public, for I want really to know, how far I have succeeded. Some would find fault with certain descriptions of particular actions of Shivaji. I will give an instance. It is generally believed that Shivaji treacherously murdered Afzul Khán. The particulars are given, I suspect, as they are found in Mahomedan history. Guarded by this evidence, and influenced by a particular education, the tribunal of educated public opinion has pronounced the verdict of guilty against Shivaji. But with this I am not concerned. What are the national feelings of the Marathas on the subject is the question I want to answer. I have got a manuscript copy of a Sanskrit poem written about the time of the last Bajirao (as appears to be the case from internal evidence), and therefore by a Brahmin of the old orthodox

school. He dwells on the death of Afzul Khán at length, gives particulars and expresses his personal feelings. This conclusively answers the question I have already proposed to myself. And on this I have built.

Conclusion.

I beg of the public to treat me with strictness and to pass a just verdict after weighing the evidence I have adduced.

MAHADEO M. KUNTE.

सं. काव्य 38

# राजाशिवाजी.

## भाग पहिला.

मनोरंजने शारदे! देवि! पावें.
दयाळे! कृपाळे! मला धैर्य द्यावें.
चढाया पहातों, जिथें वाट नाहीं;
जिथें शक्ति माझी न चालेचि कांहीं.
सवें रंगशी कालिदासादिकांच्या.
मला प्रेर, गे! दास मी होय साचा.
जसा थोर वाल्मीकि साधी रसातें,
तसें काव्य यावें रचायास मातें.
तुवां दाविला मार्ग त्याला भला, गे!
महाकाव्य त्याचें जना गोड लागे.
निघे जेविं योद्धा मराठा लढाया;
रणीं तीक्ष्ण तर्वार बांधून जाया;

जिताया, मराया, मनीं शौर्य वागे;
पुढें वीर चाले; हटेनाचि मागें;
मला तेविं हें काव्य यावें रचाया.
अगे शारदे! धैर्य, चातुर्य द्याया,
नसे अन्य कोणी पुरा शक्त वाटे.
मला लाव, गे! देवि! निर्विघ्न वाटे.
तुला थोर मानी शिवाजी. भवानी[१]
तुझें रूप. तूं देवि! देशाभिमानी.
कधीं शस्त्र हातीं वधायास वैरी;
कधीं गायनीं मारशी तूं भरारी;
तुह्मी सर्व रूपें जगाच्या धन्याचीं;
करा कामना पूर्ण माझ्या मनाची.

कसा सोडवी देश राजा शिवाजी ?
कसें मांडिलें राज्य हिंदूसमाजीं ?

---

१ शिवाजीच्या तरवारीचें नांव.

पुढें प्राप्त झाली खरी कीर्ति कैशी ?
कसी योग्यता थोर आली स्वदेशीं ?
कसें शोभलें भोसल्याचें घराणें ?
स्वदेशाभिमानें कसे राव राणे ?
कसे नाशिले म्लेंच्छ सर्वस्व हर्ते ?
स्वदेशीं निघाले सुकल्याण कर्ते
कसे ? सर्व हें सांग, माते! मला गे!
खरी शक्त तूं गे! तुला थांग लागे.

अधीं सांग, कैसा सुशोभे पन्हाळा ?
जिथें सर्वदा सौख्य, नाहीं उन्हाळा.
जिथें स्वच्छ पाणी सुमंत्रें निघालें,
जिथें गारुड्यानें चमत्कार केले,
असें सांगती थोर शास्त्री, पुराणें.
खरें जाणती लोक मर्मी शहाणे.
झरा कातळांतून मोठा निघे तो,

कड्यांतून, खालीं उडी धाड घेतो.
जिथें नाचती, ह्या जळाचे तुसारे,
तिथें शोभती रंग नाना प्रकारें.
दिसे चाप जें पावसाळीं नभीं तें,
खरें साम्य त्याचें, इथें नित्य होतें.
झऱ्याच्या वरी झाड तें पिंपळाचें,
जिथें साम्य होतें, महामंडपाचें.
दिसे तेथुनी दाट झाडी दऱ्यांची,
जणों लागली ओळ गांवीं अळयांची.
पशू श्वापदें नांदती फार जेथें,
शिराया शके पारधी कोण तेथें ?
उड्या मारिती वाघ; त्या किंकळ्यांचा
घुमे शब्द रानीं, जसा कां विजेचा.
कडे उंच मोठे; पुरी बुद्धि गुंगे
पहातां; मनाची महाधांव भंगे.
गुहा मस्तकीं थेट पूर्वेस आहे,

ऋषी जेथ पूर्वीं तपोभार वाहे.
जिचें तोंड आफाट झाकावयाचा,
चिरा एक काळा कितीका दिसांचा
पडे. मध्यभागीं बहु अंबराया.
फळें दाटतीं, शोभती वृक्षकाया.
थवेच्या थवे राघुंचे धांवतात,
फळें खात किल्लयावरी राहतात.
किती वाढती कर्दळी, गोड केळी !
दिसेनात कोणी मनुष्यें भुकेलीं.
जिथें गंधकाचें हि भांडार मोठें,
जना ज्यास्थळाचें महाश्चर्य वाटे.
झकाके बहू तेज, सौंदर्य दाटे.
जणों रात्र नाहीं जिथें; रान मोठें
सुशोभे. जशा लाविल्या थोर कांचा
बिलोरी, तसा रंग त्या काजव्यांचा.
असे अंबराई अती दाट जेथें,

तृणाचें बने एक मैदान तेथें.
दिसे तेज त्याचें जणों गालिच्याचें,
नऊ, स्वच्छ, नामी, बसाया मजेचें.

अशा अंगणीं ते मराठे मिळाले.
करावा कसा बेत, ऐसें ह्मणाले.
किती बैसले हात टेकोनि माथां.
किती प्रार्थिती फार देवा समर्था.
किती अंतरीं घोर दुःखें जळाले.
कुणाच्या मुखांचें हि पाणी पळालें.
तिथें एक होता पिलाजी मराठा.
मिशा सारल्या फार पेटोनि हट्टा;
कसी लांग माडींत ओढून काचा;
जळे घोर संताप, डोळ्यांत साचा;
उगारी पुढें तो करांतील सोटा;
"मराठे" ह्मणे. काय आवाज मोठा!

"मराठे इथें कोण आहेत? सांगा
भिती कां मराठे? कसी आग अंगा
पहा लाविता! आयका दोन गोष्टी.
न भ्यावें, असी चाल पक्की मराठी.
जरी माजल्या मोगलें त्रास केला,
जरी वेढितें सैन्य सारा पन्हाळा,
जरी आज मुंगीहि वर्ती शिरेना,
जरी एक पक्षी हि खाल्चा दिसेना,
जरी आज अन्ना विना प्राण जातो,
जरी चैन नाहीं, खरा मृत्यु येतो,
जरी भूक गाठी, कढे पोट सारे,
तरी दुःख सोडा; न ऐसे बसारे.
विजापूरवाले शिलेदार घोडे
मिळाले, हणाया मराठ्यांस जोडे.
घरें आमचीं हेतु त्यांचा लुटावीं;
करूं म्लेंच्छ हिंदू, फकीरी पिकावी.

कसें काय झालें कळेना मला हें,
मराठा दडे; दुःख त्याला न साहे.
मराठा रडे, हात टेकोनि माथां!
मराठा पळे, शत्रुला जोर येतां.
मराठा बुजे काय? घोडा नवासा.
मराठा भितो, शत्रुच्या काय वासा?
विजापूर सोडून हा शिद्दि[१] आला;
जसा काय घालाचि घालूं निघाला.
ह्मणे हे मराठे मऊ दूधपोहे.
तरी ठाउकें त्यास झालें असे हें.
शके जों मराठ्यांस जिंकावया, तों
पुरे जन्म; सारील साऱ्या वया तो.
असे देह, तों दास होणेंचि नाहीं;
मरूं भांडतां, हो! असो वासना ही.
जरी कोसळे सर्व आभाळ खालीं,

१. शिद्दि जोहारखान

तरी घाबरूं कां? महादेव पाळी.
स्मराहो स्मराहो, कसी कीर्ति होती.
मिळे तोरणा जों घरां तोरणें तीं
कसीं बांधलीं! फार उत्साह केला.
कसा फांस. धावा. धरा मोगलाला.
पुरे दुःख आतां. पुरें! भीति सोडा.
पुरे द्राड चिंता. उठा. कीर्ति जोडा.
उठाहो, हणाहो! चला, हो! लढाया.
तुह्मी योग्य आहां असें कां बसाया?"

जसा वाघ गर्जे, कडाडे, दणाणे,
भयाभीत होती पशू सर्व. खाणें
सुचेनाचि. गुंगोनि जाती बिचारे;
पाहाती, बुजोनी मुरोनी विचारें.
तसे बोल याचे मनीं बिंबतां ते,
पळे घोर चिंता. जना धैर्य येतें.

अर्धी जें भयाभीत काळीज भारी,
निवे तेंचि आतां ध्वजाला उभारी.
जना सर्व वाटे, भिणें कर्म खोटें.
सुचे ज्यास उद्योग, हे लाभ मोठे
खरे त्यास होती; म्हणोनी लढावें.
महायुद्ध हें, कां कराया हटावें ?
अझुल्ला मरे, जो विजापूर सोडी.
कुठे रुस्तु आहे! कुठें सैन्य घोडीं !
तसा शिद्दि जाईल कोण्या गतीतें,
असें एकमेकां म्हणूं लागती ते.

दिसे जो मराठा, असे नांव राजू,
गमे त्यास, अंगावरी येचि बाजू.
उठे फार आणून डोळ्यांत पाणी,
म्हणाला मराठ्यांस हें दीनवाणी.

१. अझुल्ला व रुस्तु हे विजापूरचे सरदार.

“ पहा म्लेंछ आहे जसा खोंड ताजा,
बशिंडें सुशोभे, सजे थोर राजा
गुरांचा. अशाच्या सवें वासराचें
कसें झुंज चाले! पळायास याचें
नसे चित्त राजी; मरे दुःख साही;
पडे घोर तापीं; दुजी वाट नाहीं.
पळावें असें योग्य वाटे मला जें:—
मराया न सांगेल कोणीहि लाजे!
पहा शत्रु आहे, महाक्रूर, नष्ट,
महाशक्त, लुच्चा, महाशूर, दुष्ट.
जिथें सर्व आभाळ फाटून जातें,
धजे कोण घालावया दंड त्यातें?
महासैन्य जेथें, तिथें सर्व किल्ली;
सवाशेर आहे विजापूर. दिल्ली
निघे त्यास साहाय्य द्याया जरी ती,
लणावें भिणें नीट, ही आज रीति

मला योग्य वाटे. पुढें तोंड देणें
मरायास जाणें. खरे जे शहाणे
असें सांगती कां? पुरें बोलणें" तो
उगा राहतो, तों महानाद होतो.
कुणी धैर्य दावी, ह्मणे वीर कच्चा.
कुणी धीर सोडी, ह्मणे फार साचा.
कुणी लाज मानी; कुणी तोंड झांकी;
कुणी शांत राहे; कुणी दंड ठोकी.

त्वरेनें उठे तो पिलाजी मराठा,
असे ढाल पाठीस, हातांत सोटा,
ह्मणे— "ठाउका तो नसे काय गाजी?
करी कोणती कीर्ति राजा शिवाजी?
भवानी दयाळू धनें यास देती.
तिचें नांव घेतां अर्धी धांव घेती.
जिथें शत्रु येतो, तिथें शस्त्र हातीं

धरोनी उभी सर्वदा ती रहाती.
बाजी झोयूता हो ! कसा वांकला तो ?
कैसा द्याया तें सुपें सिद्ध होतो ?
जेव्हां राजा हा निघाला लढाया,
तेव्हां येतो कोण युद्धीं मराया ?
फिरंगू असे माजला चाकणीं, तो
महायुद्ध मांडावया सिद्ध होतो.
तरी मोडली खोड पक्की विराची.
मुळीं खुंटली धांव त्याच्या मनाची.
उठे कोण पौरंदरीं बंड मोठें!
गिळाया निघालें, मराठ्यांस वाटे.
तरी जिंकणें लांब राहे पुढें तें.
कधीं बंड झालें कळेना जनातें.
तळें, रायरी, राजमाची, तिकोनाः—
मिळाले कसे सर्व किल्ले ? टिकेना
कुणी शत्रु. गेले लया आज सारे.

भिणें व्यर्थ आहे, न ऐसे बसारे.
मरे चंद्रराजा कसा जावळीचा!
धरी सूत्र हातांत कर्त्ता कळीचा,
बहू माजवी बंड, खोटा मनाचा,
मुसल्मान त्याचा महामित्र साचा.
कमावून कल्याण, कल्याण झालें.
कसें सोनदेवें महाधैर्य केलें !
असी कोंकणीं मांडली ही मराठी.
फुगे देह हा सांगतां शूर गोष्टी.
उडे मोलनी, भीति दावी मुलांना,
पडे गांठ जेव्हां मराठ्यांशिं, ताना
चढाच्या कुठें सर्व गेल्या? रहातो
उभा हात जोडून, पायां पडे तो.
शिवाजी दयाळू महाराज साचा;
बहू खोल तो डोह वाटे, दयेचा,

१ मुसल्मान सरदार.

ह्मणे 'मोलना, रे! भिऊं तूं नको. गा!
तुला सोडतों. जा. मराठ्या जनां, गा.'
प्रतापें प्रतापा पहा पिंगळ्यानें,
कसें बांधलें थोर देशाभिमानें!
जसें पूर्ण चंद्रीं निघे तेज, फांके
नभीं सर्व; काळोख लाजोनि वांके;
पुढें मध्यरात्रीं सुशोभा चकाके;
जसी चांदणी सर्व तेजांत झांके;
तसा थोर राजा शिवाजी असे हा.
कसा ठोकला त्या अझुल्लास, पाहा!
धरी जेविं पैल्वान पैल्वान भारी,
हणी हात काच्यांत, झेलून मारी,
पुढें पंच सारे जसे संपती ते,
अझुल्ला मरे; देव राखी पतीतें!
किती स्वार, हत्ती, किती उंट, घोडीं,
अझुल्ल्या सवें तो मुसल्मान धाडी'

पहा! सर्व गेलींच दाही दिशांला.
असा हा महाराज गाजून गेला.
जसीं पावसाळीं ढगें दाट येतीं;
अभाळा गिळी गाढ काळोख; होती
पुढें सांज; काळोख शोभे, चकाके;
जिथें खेळती वीज झाके, झकाके;
निघे तीच जेव्हां हणाया भरारी,
कडाडे, धडाडेः भिती सर्व भारी.
पडे तेथचें सर्व जाळोनि टाकी,
तरी निर्मिती ती जळाचींच टाकीं.
तसा हा शिवाजी हि दैत्यांस वांटी.
कधीं शांत मोठा; कधीं राग पोटीं;
कधीं तो लुटी म्लेंच्छ; संहार मांडी,
धरी शस्त्र हातीं, मुसल्मान दंडी.
पन्हाळा कुठें! तें विजापूर कोठें!
असे आज एथें, उद्यां कोण वाटे

कसा दूर गेला! विजापूर मोठें
लुटी; देखतां म्लेंछ काळीज फाटे."

जसा थांबला तो, तसे ते पहाया
अधीं लागती सर्व वाटा; लढाया
तयारी करूं लागले. बोल त्याचे
जनां भासले, जेंविं पातें सुरीचें.
"जरी शौर्य, चातुर्य, आम्हांत आहे,
तरी काय होणार नाहीं स्वदेहें?
नव्हे म्लेंछ हा; दैत्य साचा असे कीं;
पहा! जो जनांला, सुरांला हि ठोकी.
कधीं ना कधीं मृत्यु येणार. साहूं
रणीं मृत्यु आतां, पुढें स्वर्ग पाहूं.
घडे झुंजतां पुण्य मोठें खरें हें.
करूं नाश आम्हीच त्याचा स्वदेहें.
जगीं दैत्य ऐसा न माजे कधीं ही;

असे जीव, तों दास होणेंचि नाहीं."
पहाती शिवाजी महाराज येतां
ह्मणूं लागती ते. "पुरे दुःख आतां."

उठे लाट भारी समुद्रीं. झरारा
चढे फेस. लागे अती द्वाड वारा.
कडाडा शिडें वाजतीं. जेविं डोले
जळीं द्रोण; तैसें जहाजास झालें.
सुकाणूं फिरेनाचि. मागें हटे तें.
बहू जोर देतां जळीं आंत जातें.
सुटे धीर सांचा. उडे पाणि जेव्हां,
दिसे स्वर्ग पाताळ हीं एक तेव्हां,
दिशा धुंद; ते लोकही दंग झाले;
जाहजीं जसें आडवाटे निघाले.
शिरे आंत पाणी. पडे शीड. झाला
खरा अंत. हा मृत्यु चालून आला.

वरी मस्तकीं सर्व आभाळ काळें;
फिरों लागती, पहातां मार्ग, डोळे.
गिळाया निघाला जसा काळ वाटे;
कळेना जनां चालले कोण वाटे.
उठे त्या जनीं एक कल्होळ भारी;
सुचे त्या जनांतें न माता, न नारी.
मिळेना रडाया; कुठें चैन नाहीं.
भरे दुःख देहीं; दिसेनाचि कांहीं.
खलाशी व तांडेल लोकां दिसेना.
भिऊं लागती सर्व कांहीं कळेना.
बसे एक घालून मांडींत डोकें.
दुजा ओणवां हात टेकून वांके.
तिजा वेंगला. बुद्धि गुंगून गेली.
असीं देहभानें जनांचीं उडालीं.
कुणी देखिली दूर होडी; पुढें तो
न सांगे कुणाला; मनीं स्तब्ध होतो.

तरीही जनां सर्व बातमी मिळाली.
जसी तीच साहाय्य द्याया निघाली.
गमे फार आनंद जो त्या जनांला,
बहू त्याहि पेक्षां मराठ्यांस झाला.

महासूर्य तेजें सुशोभे जगीं या.
धजे कोण केव्हांहि त्याला पहाया?
असे रूप त्याचें प्रतापी सदाही.
दशा कोण होती? जसा राहु कांहीं
निघे सूड घ्याया; धरी जों रथाला,
भितो सूर्य; होतोहि तत्काळ काळा.
दिसे सांज; होतांच खग्रास सारा;
पुढें आवरी सूर्य शोभापसारा,
भिती लोक; "आलें महाविघ्न कां हें?
करूं स्नान पाणी, तरी राहु राहे,"
असें बोलती; थोर गंगाप्रवाहीं

उभे राहती. तेज दाटे सदाही.
जिथें कांठ मोठा सुशोभे जळाचा,
जिथें घाट आहे महादेवतांचा,
तिथें प्रार्थिती शंभुला लोक भारीः–
" सुटो सूर्य, हें विघ्न, देवा! निवारीं.
करी राज्य जें राहु, आहे किती तें?
तरी थोर सूर्या, पहा ! लाज होते.
निघे सूर्य जैसा, तसा शत्रु झांके.
पुढें तेज फांके; सुशोभा चकाके.
पडे तेज ऐसें शिवाजी नृपाचें;
महाराज जेव्हां मराठ्यांत पोंचे.
उभे राहती लोक; आनंद चित्तीं;
मनीं फार संतोष; शोभा मुखीं ती.

दिसे मोहनी मूर्ति; तेजाळ डोळे;
कपाळीं चढे ढाळ; ते केश काळे;

मिशा वांकडया; तोंड गंभीर भारी;
जनांच्या मनीं जें उमेदी उभारी.
पागोटें साधें, मस्तकीं शोभतें जें;
ऐसीं वस्त्रें तीं; सर्व पोषाख साजे.
हातीं शस्त्राचे खेळती तेज बिंदु.
पाण्यामध्यें तो नाचतो जेविं इंदु.
पुढें हा शिवाजी मराठ्यां जनांला,
अती गोड मंजूळ शब्दीं ह्मणाला.

"सुखी काय? कां क्षेम आहे मुलांचें?
पडे संकटीं देश. हिंदूजनांचे
किती क्लेश पाहूं! मुसल्मान माजे;
लुटी देवळें; देह हा फार लाजे;
धरी ब्राह्मणा; त्रास होतो मना हा;
चिरी गाय; कांटा शरीरीं उठे; हा!
अरे! ब्राह्मणा, देवळा, त्रास हा कां!

चला, या, रडूं. देव ऐकेल हाका.
अरे धांव. देवा! सख्या तूं परेशा!
विना ईश्वरा कोण तारील देशा?
बुडे आमचा देश हा दुःखडोहीं.
'मुसल्मान माजे. न चालेचि कांहीं.'
असें बोलणें योग्य नाहीं मराठ्यां.
असे देह, जों हातहा, ह्या तुराट्या;
कुटूं शत्रु, ठोकूं, हुधाडूंचि सारे.
धरा धीर कांहीं. न ऐसे बसारे.
किती पांडवां गांजलें कौरवांनीं!
झटे देव कैसा! पहा थोर, मानी.
दशा रावणाची, पहा! कोण झाली!
कसा मारिला राघवें दुष्ट वाली!
स्मरा याकथा. देव कैवारधारी.
महासंकटा एकटा तो निवारी.
पडो देह हा. मोगली राज्य झालें.

मुसल्मान राजे सुशोभूं निघाले.
असे आमचा देश या हिंदुलोकीं.
कसे चोर आलीचि ! देशा ! विलोकीं.
कसें सांव, देशा ! मुसल्मान झाले !
असे देश ज्यांचाचि ते बंडवाले.
धनी आज झाला खरा चोर, देशा !
तुझी साक्ष आहे. नको भंगुं आशा.
किती काळ हिंदू इथें नांदले हे ?
उठीं, सांग लोकां. जगीं सत्य आहे.
उठीं, लाज कांहीं नको. हाचि रागा
तुझें लेंकरूं; बाप तूं, गा ! पुराणा.
तुला ठाउकें सर्व आहे मुलांचें.
उठीं, सांग सारें. मुसल्मान साचे
मराठेच किंवा ? कुणी राज्य केलें ?
असें आमचें राज्य; हे कोण आले ?
इथें नांदती हे मराठे सदाही.

करूं राज्य आह्मी. नसे भेद कांहीं.
जरी सैन्य नाहीं; जरी शत्रु तानें
भरे; देश राखूंच देशाभिमानें.
स्वदेशीं असावे स्वदेशीय राजे;
स्वधर्म, स्वशास्त्र, स्वदेशीं विराजे.
स्वनाथें प्रजेला जपावें. भजावें
प्रजेनें स्वनाथा. मुसल्मान जावे.
स्वदेशीं असावी स्वदेशीय रीति;
जनांच्या मनाला खरी मान्य होती.
खरें शास्त्र आहे, पहा! स्पष्ट हें. कां?
स्वदेशास रक्षूं, धरा हाचि हेका.
मनीं वागवावी कथा ती गितेची.
मरूं झुंजतां:--चाल ही क्षत्रियांची.
जरी फौज नाहीं, कराया लढाया;
तरी धैर्य आहे; लढूं या, मरूं या.
रिकाम्या उड्या मारितो शत्रु, हा! हा!

जुळूं आज युक्ति. हणूं त्यास, पाहा.
जिथें शौर्य आहे, तिथें युक्ति चाले.
न आह्मी; तरी शत्रु हे बंडवाले.
स्वदेशास नाशावया, घोर केली
लढाई, झटे शत्रु. ऐकाच भ्याली
मुसल्मान सेना. तुह्मी वीर सारे;
खरें शौर्य, चातुर्य जेथें भरारे."

जसा थांबवी बोलणें हें शिवाजी,
मराठे हि झाले मनीं फार राजी.
खऱ्या वेधल्या चित्तवृत्ती जनांच्या,
भरे भाषणीं रंग ऐशा तऱ्हेचा.
वसे शौर्य पोटीं; मनीं गाढ भक्ति;
सदा मान्य ज्याला रणांतिल मुक्ति;
पडे तेज ज्याचें मराठ्यासमाजीं;
जसा शुक्र शोभे नभीं थोर गाजी;

असे देशपांडे[1] जनांला म्हणालेः—
"पहा! हें नशीबीं खरें आज आलें.
धनी होय जेथें दगेबाज, दुष्ट,
तिथें लोपला न्याय; हा अर्थ नीट.
मराठ्यांस खोटे, मुसल्मान मानी,
महाघातकी, चोर, लुच्चे निदानीं;
तरी हा मुसल्मान खोटा स्वभावीं,
मनीं एक आणी, जनीं एक दावी.
आहे, पहा! घोरपड्या मुधोळीं;
जो क्रूर, लुच्चा, जनचित्त जाळी;
जो घातकी, वोंगळ, दुष्ट, खोटा;
कोंडी मराठा, जनहा मराठा.
जुळी जेविं कोष्टी अधीं सूक्ष्म तंतु,
रची छान जाळें, पुढें जीव जंतु
पडे त्यांत; तों वाघसा चोर चाले,

[1] बाजी परभू देशपांडे.

उडे, प्राण घे, खात हें मांस, डोले.
तसा चोर बाजी मुधोळीं निघाला,
धरी जेवतां, जेवतां, त्या जनांला,
महाराज ज्यांचा महापुत्र साजे;
मनीं कृत्य तें आणतां चित्त लाजे.
करी चोर बाजी मुसल्मान सेवा.
जसा शत्रु सांगे, तसी चाल, देवा!
सदा आचरी जो, तरी कोण लुच्चा?
मुसल्मान किंवा मराठाचि साचा?
करी शामराजा मनीं बेत मोठेः—
धरावा महाराज हा चोर वाटे.
तरी तो फसे शामराजा निदानीं,
मुसल्मान लोकांस जो फार मानी.
असे हे मुसल्मान सोदे सदाही,
नसे ज्यांत लज्जा, न विश्वास काहीं.
तरी हे मराठे कसे चोर झाले?

स्वदेशीं निघालों कसे बंडवाले?
तयारी करूं, आज हा देश राखूं;
चला आज जाऊं, मुसल्मान हाकूं;
लढाई करूं, दुष्ट लोकांस ठेचूं;
ह्मणूं त्या, जसा डंखतो द्वाड विंचू."
जसा थांबला हा पुढें बोलतांना,
मराठ्यांमधें कल्पना कोण नाना
उठूं लागती! सिद्ध होती लढाया,
मराया, स्वदेशास ह्या सोडवाया.

जिथें कीर्र झाडी; कडा घोर लागे;
जिथें वाघ ढाण्या अहोरात्र वागे;
सदा कोकिला ती जिथें गोड गाते;
जिथें स्वच्छ पाणी झऱ्यांतून येतें;
जिथें रोगराई कधीं होत नाहीं;
अशा घाटमाथीं वसे मावळी ही.

उठे मावळी हा, तयारीस लागे,
रणीं झुंजतां जो बघीनाचि मागें.
जरी मूर्ति साधी सुधी, तेज नाहीं;
जरी बावली होय चर्याहि कांहीं;
तरी शौर्य, चातुर्य, पोटीं वसे जें;
निघे तें प्रसंगीं, सुशोभे स्वतेजें.
स्वदेशाभिमानें, सुसंसार सारा,
मनीं भक्ति, देहीं, भरे युद्धवारा.
चलाखी करी सर्व कामें कराया.
पटाईत, पक्का शिकारी; शिराया
बहूडंग, चाले जसाकां घरातो;
पुढें पाय जो सर्वकामांत घेतो.
दऱ्या, चोरवाटा, बहू ओघळी कीं,
गुहा खोल, खिंडी:—जसा वास लोकीं
गमे त्यास; ह्या ठाउक्या सर्व ऐशा.
जसें वानरां ये उडायास, तैशा

कडयांतून धांवा निघे घेत साचा,
जणों भासतो वंश हा मारुतीचा.
खरीं वानरें सिद्ध होतीं लढाया,
जरी नेणतीं तीं कशा त्या लढाया
निघालीं जसीं राघवाच्या सवें तीं,
घरा चालुनी कीं महाकीर्ति येती.
न बाधे हवा ज्यां, न बाधेहि पाणी.
शरीरांत त्यांच्या असे फार पाणी.
मिळाले असे मावळी; एक टोळी
करूं लागले ते, हणायास गोळी.

त्यांना तिथें हेटकरी मिळाले,
जे सर्व कामांत हुशार झाले.
तो मावळी, हेटकरी तसाही,
ज्या भूक नाहीं, न तहान कांहीं.
जिथें टेकडया; वृक्ष आहेत मोठे;

झरे; पाट; पाणी; जिथें सौख्य साठे.
जिथें वांयूगणींचें दिसे तेज मोठें,
पिके भात, तेव्हां घरीं धान्य दाटे.
जिथें थोर खाडया; तटीं अंबराया;
फळें लोळतीं, तीं असे कोण खाया?
जिथें वाघ नांदे, गुरां काळ भेटे;
जिथें जंगलें, डोंगरी रान कांटे.
अशा कोंकणीं तो रहातो सदाही,
असे कायती भीति, माहीत नाहीं.
चढे डोंगरीं तो, जिना जेविं आहे;
नदी काय! खाडींत अपार पोहे.
अती उंच जातो नभीं सोट ज्याचा;
मुळ्या लोंबती; बुंध बाहेर; साचा
सडासा उभा जो; न फांदीहि कांहीं;
उठे वीर जैसा कराया लढाई;
वरी मस्तकीं कोण मांडी पसारा!

जसा सिंह शोभे, धरी केशभारा;
निघे तेथ पाणी, गळे जेविं मस्ती;
सजे मल्लसा जो लढायास कुस्ती;
असा माड ज्याचा खरा जीव आहे.
चढे त्यावरी खोबरें खात राहे.
हरे भूक त्याची; निवे तान्ह; त्याचा
घटे हात, ते पाय, तो देह साचा.
अर्धी चोळणा, त्यावरी लांब काच्या
कसी; कंबरेला चढे जोर त्याच्या.
पळाया, दडाया, चढाया, लढाया,
शकेना कुणीहीं पुढें त्या टिकाया.

महाशूर होते तिथे तीर वाले,
लढायास ज्यांच्या सवें भिल्ल भ्याले.
धनुष्यें दिलीं टांगुनी; युक्ति सारी
असे तीर भात्यांत; झाली तयारी.

दिसे तोंड ज्याचें किती उग्र! डोळे
खरे तीव्र; दाढी बहू लांब; लोळे
शरीरावरी घोंगडी, रुंद, साधी;
मिश्या, थोर कल्ले, शिरीं घट्ट बांधी.
रामोशी झाले सिद्ध आतां लढाया,
येईना हातीं ज्यांस बंदूक घ्याया.
नाहीं ठावें कीं तें कसें युद्ध होतें,
मारावी कैसी तीक्ष्ण तर्वार हातें.
हणी लांब धोंडा तरी गोंफणीचा,
जसा काय दे नाग रट्टा फणीचा.
वनीं कोसळे जेविं पर्जन्य मोठा,
तसा गोंफणीचा झणाणे झपाटा.

मुखीं क्रूरता; वर्ण काळा कसासा;
शिरीं केश राखी; सजे मांग ऐसा
लढाया हणायास; खोरेंचि हातीं

खणायास माती, रचायास भिंती.
जिथें चंद्रभागा सदा सुप्रवाहें
जनांला जळें सौख्य दे, स्वच्छ वाहे;
प्रदेशीं अशा शूर जो शूद्र राहे,
उभा एथ तर्वार बांधून आहे.

जो पागोटें पीळ घालून बांधी;
बालंपेचा आयटीदार साधी;
ज्याचे कल्ले उग्र भेसूर; चाले
जिंकाया जो, वीर ऐसे निघाले.

ज्यांना पट्टयाचे ठाउके हात सारे;
ज्यांच्या चापल्यें शत्रु साचा गरारे;
चारी तर्फांही तीक्ष्ण तर्वार चाले;
योद्धे ऐसे हे शौर्य दावूं निघाले.

वाई, जंजीरा, तो कुलाबा, तिकोना

सोडून आले वीर मोठे. कळेना
कोणाचें कोठें गांव आहे. मराठा
सारा अला तो, फार पेटून हट्टा.

घुमे शब्द किल्ल्यांत जों वीर गर्जे,
मुखीं सर्व हर्हर् महादेव गाजे.
ध्वनी हा दऱ्यांच्या मधें गर्जनेला,
करी; दुष्ट लोकां खरा मृत्यु आला.
पुढें शिंगवाला सरे, शिंग फुंकी;
खरें शौर्य जागें करी रावरंकीं.
जसें वर्णिती शूर गीर्वाण चंपू,
तसे वीर सारा रची थोर कंपू.
सर्वांत सर्नोबत मुख्य चाले,
ज्याच्या सवें शौर्य रणीं निघालें.
सम्शेर बांधी रणशूर योद्धा,
बांका रणीं फार, जनांत साधा.

मार्गें जरा, पांच हजारवाला
सर्दार हें युद्ध करूं निघाला.
जो सर्व मानीत हुकूम चाले,
ज्याच्या मुखीं तेज मनोज्ञ डोले.
होते कितीएक हजारवाले!
मार्गें पुढें कीं तजवीज चाले.
दाहांस नाईक; शतांस होते
योद्धे जिमेदार हुकूम देते.
चकाकेचि तर्वार, तर्वार सारी;
जसा वीर एकीकडे म्यान सारी.
धरी शूर तर्वार हातांत. वाटे,
सजे कर्ण, तो भीष्म; नाहीं मराठे.

चिरा तेथ काळा पडे. त्यावरी तो
शिवाजी चढे, जो जना सौख्य देतो;
अधीं न्ह्याळतो ते मराठे मिळाले;

पुढें थोर आवाज काढून बोले:--

"हो सर्व योद्धे! रणशूर वीर!
हो राव गाजी! रणरंग धीर!
रण प्रसंगीं लढणार शूर!
चुके कसें नेम, अचूक फार!
लागो नये नाट; रणीं चला, या.
तुह्मा सवें कोण टिके लढाया?
संधान साधो. सुरणीं धुमाळी
चालो. मुसल्मान पडोत खालीं.
हणा हे मुसल्मान जो तोंड वासे
कुटा शत्रु हे रक्त वाहो नदीसे.
मुसल्मान हे दुष्ट, जे गाय खाती.
नको नांव त्यांचें; मिळो त्यांस माती.
बंदूक हातीं; रण हें लढाया.
तुह्मा पुढें कोण धजे लढा, या?

गेले मुसलमान किती मरून.
राखावया प्राण किती पळून.
कुठें रस्तु आहेचि? थोडीं हजार?
कुठें ते विजापूरवाले हि वीर?
कुठें तोफखाना अझुल्ला विराचा?
चला धैर्य दावा. महाशौर्य वेंचा.
पडे देह ज्याचा रणीं; स्वर्ग त्याला
मिळे. सत्य आहे. स्मरा त्या गितेला.
खरा शिद्दि मायेमधें लोळतो. हा
स्मरीना; तुह्मी हे किती शूर आहां.
धरा चंग बांधून तर्वार हातीं.
हणा शूर तर्वार, तर्वार होती
खरी. युद्ध माजो; मुसल्मान लाजो;
रणीं शिंग वाजो; मराठा विराजो."
पुढें थांबला जों शिवाजी; जनांला

१ मुसल्मान सरदार.

गमे कोण आनंद त्यांच्या मनाला.
पुरेसे गमेनात हे बोल गोड,
फिटेना मनाचें पुरें सर्व कोड.

खरी सांज झाली. जगीं सूर्य नाहीं;
दमे फार पक्षी, पशू सर्व कांहीं.
निघाला शिवाजी घरीं जावयाला.
तसें शिंग फुंकूं निघे शिंगवाला.
जनीं सर्व हर्हर्महादेव झाला.
भरे नाद किल्ल्यांत गांठी नभाला.
ध्वनी हा घुमे सर्व रानांत, लोकीं.
उठे वाघ, जो किंकळी थोर ठोकी.
तसीं श्वापदें घाबरीं सर्व झालीं;
भिऊं लागलीं तीं; पळाया निघालीं.
असा एक कल्होळ, कल्होळ झाला.
दणाणे मुसल्मान, गाजे पन्हाळा.

उभे वीर उपसून तर्वार हातीं.
चकाकेचि तर्वार, कीं वीज होती.
पडे तेज हें त्या पन्हाळ्यांत जेव्हां,
दिशा सर्व झाल्या चकाकीत तेव्हां.

"मरूं भांडतां भांडतां, शत्रु आला;
पहा! ह्या पन्हाळ्यास वेढूं निघाला;
तरी ढंग हें सर्व काढून टाकूं;
चला शत्रु ठोकूं; मुसल्मान हाकूं."
असें बोलते ते मराठे निघाले;
घरीं पोंचले. शौर्य नाहीं निवालें.
नये नीज; त्या हुंदका ये पुन्हा तो.
पडे स्वप्न, रक्तें रणीं आज न्हातों.

**भाग पहिला समाप्त.**

# राजा शिवाजी.

## भाग दुसरा.

घराला शिवाजी जसा पोंचला कीं;
चकाके महाज्योत, ऐसें विलोकी.
पुढें देखतां रूप, संतोष झाला.
महानंद वाटे, नृपाच्या मनाला.
जरा रात्र झाली; दिशा छान रंगे;
जिथें थोर आभाळ पृथ्वीस लागे;
फुटे झाक तेथें गुलाबी, विराजे;
वरी शुक्र शोभे; सुसौंदर्य साजे.
मुखाची असी ढाल; ते केश काळे.
मधें काढला भांग; वेणींत खेळे
सुशोभा; सुनेत्रांत लावण्य नांदे.
खुले सौम्यता; कांतिनें देह कोंदे.

चढे जोर शोभेस; तारुण्य साजे.
निघे तेज. वाटे खरा चंद्र लाजे.
नको दागिना, जेथ सौंदर्य राहे.
नको फार चातुर्य, ज्या सत्य आहे.
असा देह सारा सुशोभे; जराही
उणें त्यांत नाहीं; सजे सर्व कांहीं;
स्वताच्या रुपानें, चकाकीत अंगें;
जिथें सर्वदा खुद्द सौंदर्य रंगे.
जागे मनीं प्रीति; पतिव्रता हे;
विश्वास मोठा नवऱ्यांत आहे.
जों लाड सारे पुरवी पती कीं,
तों स्त्रीस हें सार्थक याचि लोकीं.
जिची ठेव साधी; जिला छान नाहीं;
जिची नम्र चर्या, नसे त्रास कांहीं.
जिचें साजरें, कौतुकी, बोलणें तें,
पतीच्या मनाचें महादुःख नेतें.

अशी सोयरा बाइ राणी मनोज्ञ
पुढें ये, जसा तो शिवाजी हि सुज्ञ
घरीं पोंचला; तों ह्मणायास लागे;
जिच्या भाषणीं रंग, चातुर्य वागे.

"अहो प्राणनाथा! दयाशील देवा!
करावीच आह्मी पतीची सुसेवा.
पुसावी कशी राजदर्बार गोष्ट?
तरी राज्य हें सोसवी थोर कष्ट.
सकाळीं, दुपारीं, सदा युद्ध चाले.
बसाया, उठाया, नसे वेळ. आले
मुसल्मान समशेरवाले लढाया.
पुरे युद्ध आतां; नको ह्या लढाया.
घरीं सौख्य आहे; घरीं शांति आहे;
घरीं मूल आहे; घरीं बायको हे.
जरी सांगणें गोड माझें न लागे,

महादुःख होतें, मनीं ह्या मला, गे!
सुचेनाचि खाणें, पिणें, सर्व कांहीं;
सदा युद्ध; तर्वार हातांत; नाहीं
मनीं चैन; मारूं, मरूं, हें मुखानें
ह्मणावें; कशी वेळ कंठूं सुखानें!
सुखाचा झरा आमचा कोण आहे?
असें सौख्य तुह्मा, तरी सौख्य वाहे;
रणीं रंगती वीर रक्तें; भरारे
महा युद्ध; हा देह माझा थरारे.
रणीं ह्या जरी आपणाला अपाय
घडे; सर्व आह्मीं करावेंचि काय?
मनासारिखा दुष्ट वैरी नसावा,
सदा कल्पितें जें भयें घोर. देवा!
रणीं लोळती रक्तबंबाळ वैरी.
मराठ्यांस कां मृत्यु दाटून मारी!
मना तूं असें हें नको आज चिंतूं.

मना टाक तूं द्वाड हे दुष्ट किंतू.
पहा ! बोलती वीर किल्ल्यांत सर्व;
चला आज, मोडूं अधीं म्लेंच्छगर्व.
कसें काय होईल देवा! तुला कीं
कळे. वास हा आमचा मृत्यु लोकीं.
मुसल्मान हा मस्त, मुर्दाड, खोटा.
मराठा खरा शूर, मारो झपाटा.
कसें युद्ध होतें पहायास जाया,
मनीं आज येतें. पराधीन जाया."

दमे बोलतांना. मुखीं घाम आला.
निघे हात तेव्हां पुसायास त्याला.
नथीखालचा घाम लागे पुसाया.
निघे तेज तोंडीं, सुशोभे सुकाया.
पदर ती धरती स्वकरीं; जपी;
मुरडुनी उचली नथ; ती टिपी

हळुच घाम; सलज्ज; जरा भिते;
वळण हें रतिचें जणुं भासतें.

शिवाजी महाराज मानी मनीं कीं,
नये वेळ ऐसी कधीं मृत्युलोकीं.
असा रंग काळीज भेदूनि गेला.
पडे मोहनी त्या नृपाच्या मनाला.
मनीं लागले तीर हे तीव्र भारी,
भुले युद्ध, तें शौर्य, ते म्लेंच्छ वैरी;
तरी तो पुन्हा रंगला शूर राजा
लढाईंत. त्याला सुचेनात मौजा.
मुखीं शांति; नेत्रीं भरे प्रीति; अंगीं
दिसे रंग; तो बोलला त्या प्रसंगीं:—

"सखे साजणी, सावली तूं मला, गे !
कलीदा जिवाचा, तुला दुःख लागे.

तरी ऐक आह्मी लढावें, मरावें.
सदा धर्म हा, कर्म हें आचरावें;
स्वदेश, स्वभार्या, पराधीन होतां,
पडे रौरवीं कूळ. माझी सुमाता
मला जन्म देऊन हें दुःख साही,
तरी दुष्ट ऐसा जगीं पुत्र नाहीं.
जनानीं रहावें कसें ? ईश्वरानें
दिले धर्म लावून. तो भिल्ल रानें
फिरे, विप्र मागे शिदा. खेळ बाळा
सुचे. यापरी विश्व चाले. विरांला
दिला धर्म लावून, त्या ईश्वरानें
"लढाया हणा शुद्ध देशाभिमानें."
जेव्हां टळे हें परचक्र मोठें,
तेव्हां खरे हे ठरले मराठे.
हा देश होईल निवांत थंड,
हा शत्रु जातांचि, हटेल बंड.

पुरें काम झालें तरी सर्व नाहीं;
पुढें मांडतां राज्य, ही त्रास कांहीं.
जसा धर्म सांगे; विरांनीं लढावें;
तसा धर्म; त्यांनीं प्रजेला जपावें.
प्रजापालनीं पुण्य मोठें घडे कीं,
घडे वास राजांस, त्या स्वर्ग लोकीं.
घरीं रंगतां, रंजतां, सौख्य वाटे,
सुखें भोगतां, भोगतां, दुःख सांठे.
सदा सौख्य खोटें; सदा दुःख खोटें;
सदा युद्ध खोटें; सदा सत्य मोठें.
कधीं शत्रु माजे; रणीं युद्ध चाले;
कधीं देश थंडा; घरीं वीर आले.
प्रसंगीं अशा, रंग हा गोड लागे,
सुखें भोगतां, सौख्य वाटे मना, गे!
नको दुःख कांहीं करूं तूं; पहा हें;
रणीं मृत्यु येतां, पुढें स्वर्ग आहे.

रणीं मृत्यु येतां खरा वीर गाजे.
स्वभार्या मिळे शत्रुला; तो विराजे.
घराणें विराचें तरी फार लाजे.
स्वभार्या अधीं मारतां शौर्य साजे.
कधीं बायको लागतां शत्रुहातीं;
खऱ्या शूर लोकां, खरी लाज होती.
स्वहस्तें पडावा तुझा देह वाटे
सुराणे सदा चालती याचि वाटे.
हटे शत्रु मागें; महायुद्ध चाले;
पळे शत्रु रानीं; रणीं कार्य झालें.
जसे जिंकिती हे मराठे, मला तों
महानंद होईल. सांगूं किती तो ?
घरां तोरणें खास बांधूं; गुड्यांना
उभारूं; करूं थोर उत्साह नाना.
पहाया मुसल्मान जाशील जेव्हां,
जिवाच्या विसाव्या! उठे भीति तेव्हां. "

जसा थांबला तो पुढें बोलतांना,
मनीं आणती कल्पना स्त्रीहि नाना.
अर्धी वाटलें लाड माझे कराया,
सदा सिद्ध आहे मम प्राणराया.
पुढें ऐकतां भाषणें तीं नृपाचीं;
मनीं स्तब्ध झाली; गमे भीति साची.
बघूं लागली चित्त गंभीर झालें,
मनीं रक्तबंबाळ ते वीर आले;
भयें ग्रासलें चित्त; ती दुःख मानी,
पुढें बोलतां राय देशाभिमानी.
पुन्हा चित्त झालें, सुखी, गोड, शांत,
रणीं जिंकितो, भासलें तीस, कांत.
पुन्हा भाषणें भीति वाटे मनाला;
जसा तो स्वभार्येस मारूं ह्मणाला;
करी धाकटें तोंड तेव्हांचि राणी;
थरारे; भरे फार डोळ्यांत पाणी.

तरी शेवटीं बोलणें गोड लागे.
निवे भीति सारी; पुन्हा प्रीति जागे.
असे रंग नाना मनीं येत गेले;
कधीं सौख्य झालें, कधीं चित्त भ्यालें.
जसी ये सती देहभानीं स्वताचे,
पुन्हा मोहिलें चित्त भारी नृपाचें;
हसूं लागली गोड गालीं जराशी.
जमे एक ठायींच सौंदर्य राशी.
पुढें ती ह्मणाली शिवाजी नृपाला:-

“अहो प्राणनाथा! पुरे आज लीला.
मला भीति वाटे. नको युद्ध कांहीं.
पडे वीर युद्धीं. नको जन्म बाई.
नका नाव घेऊं रणाचें. पुरे तें.
नव्हे शत्रु हा; काळ आला विरांतें.
नव्हे युद्ध हें; आग लागे स्वदेशीं.
नको द्वाड जंजाळ; राहूं उपाशीं.

शरीरीं खरे आज रोमांच येती;
नको पाहणें ती लढाई कशी ती.
मला वाटलें कीं लढाई पहातां
मना सौख्य वाटे. तरी युद्ध होतां
रणीं रक्त वाहे, मरे शूर लोक.
नको ती लढाई. नको दुष्ट शोक.
पहाया न जाऊं; घरीं आज राहूं;
महानंद भोगूं; ह्मणाहो जरा हूं.
जगीं कायतो सर्व संसार मोठा,
तुह्मां गोड लागे रणाचा झपाटा.
जरा युद्ध राहो; मुसल्मान राहो;
जरा गोड ऐशा घरीं ह्या बसा हो!"

दमे बोलतांना. भयें कंठ दाटे.
मनीं दु:ख झालें. जशी कां झपाटे
अशी देखिली त्या नृपानें; ह्मणाला:—

"सखेगे! प्रियेगे! मम द्रौपदीला
किती दुःख झालें! किती त्रास झाला!
तरी ऐक युद्धाविना कां विरांला
गमे? युद्ध त्यांनां महोत्साहकारी,
नको सौख्य त्यांनां. नको ही स्वनारी.
रणीं वीर हर्षे, लढाया सरारे;
मनीं शौर्य, चापल्य त्याच्या भरारे.
धरी शूर तर्वार हातांत वीर,
पुढें चालतो शत्रु लोकांसमोर.
अशा वीर लोकां कशी स्त्री असावी?
महाशौर्य, चातुर्य, हीं जीस ठावीं.
जिला दुःख थोडें; जिला भीति थोडी;
जिला धीर, धारिष्ट, देतात गोडी.
भिणें कर्म खोटें; नव्हे तें मराठें.
पहा दुःख भोगी सुसीताहि मोठें.
वनीं त्रास झाला; मनीं त्रास झाला;

पुढें रावणें तीस नेलें घराला.
तरी धीर नाहीं तिणें सोडला कीं.
किती गांजलें तीस त्या दुष्ट लोकीं!
भिणें, नाजुकाई, असावी स्त्रियेला,
महा क्रूर वैरी पुढें जों न आला."

इथें थांबला. तो; मनीं लाजली ती;
दिसे गोड बाहेर; ती भीति चित्तीं;
तिच्या लागले शब्द भारी मनाला.
कळाया, म्हणे कौतुकें ती नृपालाः—

"धनी, हो! जिवाचे! तुह्मी सूर्य. पाहा!
प्रकाशे महाचंद्र; आधार आहां
तुह्मी. तेज आहे किती आपणांत!
दडे म्लेंछ काळा, ममप्राण! कांत!
तुह्मी राम; नाहीं सुसीता खरी मी.

मला भीति वाटे, असे शौर्य रामीं.
चला आज दावा मुसल्मान वीर.
मला भीति नाहीं, असे फार धीर.
पहातां मुसल्मान नाहीं भिणार;
बसूं सर्व आह्मी बुरूजांत दूर.
सवें आमच्या तेथ यावें. चला, कां!
पहाया भिते काय मी म्लेंच्छ लोकां? "

असी बोलली ती, मनीं धीर केला.
हसूं लागला तो, महानंद झाला.
महाशौर्य झालें; पहाया निघाली,
मुसल्मान लोकां, मुखीं बोट घाली
महाराज तेव्हां, स्त्रियेला म्हणाला:—

"सुसीते! दिला धीर मोठा मनाला!
नको शौर्य नुस्ती पहाया लढाई.

नको धीर एथें कराया चढाई.
सखे! शूरयुद्धें करावीं घरांत.
नको दूर जाणें लढाया रणांत.
पुरे शौर्य आतां; पुरे युद्ध आतां.
हसायास येतें; मनीं कोण गुंता
पडे, रूप हें गोड एथें पहातां.
जरा थांब. आली सखे! थोर माता."

चपचपां उठली; दिसली कशी!
झळकतो जणु चंद्र नभीं, तशी.
खुदकिनी हसली; मग ती बसे;
सवळ आड; नृपास जरा दिसे.
चकचके बहु तेज तिच्या शिरीं;
पदर सोज्वळ ती हळु सांवरी;
फिरविती कर ती स्वमुखावरी;
नृप बहू रमला सुखमंदिरीं.

शिवाजी पुढें ती जसी माय आली,
तसी तीक्ष्ण तर्वार ठेवून खालीं,
धरी पाय तो; तों तिला सौख्य झालें;
ह्मणे "बाळ माझें रणांतून आलें;
रणीं गाज बाबा, घरीं शोभ बाबा,
करीं राज्य, हिंदूंत चालो घरोबा"
असें बोलली, बैसली ती समीप;
पुढें बैसतां, शोभला तो सुदीप.
जिचीं लोटलीं पार पन्नास वर्षें;
जिची वृद्ध काया महाशांति वर्षे;
जिला दुःख ठावें; जिला सौख्य ठावें;
निदिध्यास हा तीस वैरी मरावे,
धुकें दाटतें; तों ढगें फार येतीं;
जरी चांदणी रात्र आहे खरी ती;
तरी चंद्र थोडा दिसे तेजहीन;
असी शोभली ती सुमाता कुलीन.

चढे न्ह्याळतां शूर, हिंदुप्रदेश;
करी मस्तकीं पांढरा शुभ्र वेश;
( शके फक्त तो शक्र पूर्वी चिराया
चिरी आज हा लोक त्या डोंगरा या, )
नसे त्राण देहांत, वृद्धापकाळें;
जळे ज्वाळ; आहेत कीं लाल डोळे
पहातांच ज्वाला मनीं नम्र होती
मनुष्यें; जिथें शंभु शोभे, तसी ती
रमे पार्वती; त्या हिमाद्रीसमान
दिसे ही सुमाता, जिचा थोर मान.
शिवाजी ह्मणाला स्वमातेस, " आई,
तुझी गोड वाणी सदा सत्य बाई !
तुझें बोलणें व्यर्थ गेलें असें हें
घडेना कधींही. करूं या स्वदेहें
सदा युद्ध. त्या म्लेंछ लोकांस हाकूं.
नको घोर वाहूं. नको अन्न टाकूं.

नको द्वाड चिंता करूं तूं. मला, गे !
कधीं त्रास होणार नाहीं. न लागे
तुला सांगणें. बाळ आहे तुझा हा.
तुझा प्रेम, आई ! किती गोड ! पाहा !
यशोदा जसी ती जपे कृष्ण बाला,
तसा लाड माझा तुवां फार केला. ”

सजे सूड घ्याया मुधोळी कुळाचा,
सदा पाहती शत्रु पाण्यांत साचा;
मनीं देशकैवार, चातुर्य वागे;
पुढें सुज्ञ माता ह्मणायास लागे:--

“ तरो धर्म हिंदु; बुडो म्लेंछ धर्म;
चढो हा मराठा; कळो सर्व वर्म.
पहा ! गांजती म्लेंछ हे हिंदुलोक;
करीं युद्ध मोठें; मुसलमान ठोक.

ह्मणे काय दादा[1] स्वमृत्युप्रसंगीं?
सदा तें स्मरीं. वीर आहेस जंगी.
अर्धीं ब्राह्मणा, गाइला तूं जपावें.
तुला शंभु तेव्हां रणीं खास पावे.
जळे चित्त माझें; किती दुःख भोगूं?
कुटीं शत्रुला तूं दुजें काय मागूं?
करो देव माझा सखा पुत्रराज
चिरंजीव; शत्रूंस पाणीचि पाज"

असें बोलती माय, तों शंभु आला;
घुसे आंत; काठीवर स्वार झाला.
हसूं लागली सुज्ञ आजी; मुलाचा
करी लाड; ताईत मानी गळयाचा.
पुरीं तीन वर्षेंहि नाहींत झालीं;
तरी माय बाळास टाकून गेली.
ळळा आजिचा त्यास लागे ह्मणून,

१. दादाजी कोंडदेव.

भुले माय ह्या आजिमागें फिरून.
चिमुकली पगडी झळके शिरीं;
चिमुकली तलवार धरी करीं;
चिमुकला चढवी वर चोळणा;
चिमुकला सरदार निघे रणा.
छबुकडा चिमुणा करतो गुण;
चिमुकलें धरलें मग रंगण;
दुडदुडां पळतां पळतां पडे;
गडबडे, रडतां मुख बापुडें.

तसी वृद्ध आजी उठे; त्यास घेती
पुढें पोटिशीं; तोंड त्याचें पुसे ती.
हसूं लागला, तों सुखें ऊर दाटे;
फुटे प्रेमपान्हा; तिला स्वर्ग भेटे.
शिवाजीस ही फार संतोष झाला;
उठे, बाळ घेऊं स्वतां तो निघाला;

धरी त्यास; हातांत उचलोन झेली;
महा रम्य खेळें, महा मात झाली.
असे टेकडी दूर राजापुरीं जी;
तिचे पाय तो सिंधु साक्षात पूजी;
तिची नित्य सेवा करी अग्नि भारी;
मिळे उन्ह पाणी, सकाळीं, दुपारीं.
तिच्या मस्तकीं वृक्ष शोभा चकाके.
निघे सूर्य, तेव्हां महा तेज फांके.
किती रम्य हें स्थान! गंगा पहा! ती
त्यजी थोर काशी; स्वतां सिद्ध येती
इथें. पांच कुंडें वहाती भरून;
महा पूर येतो, सुपृथ्वी फुटून.
मध्यें कुंड मोठें तडाडे जळाचें;
चोहों बाजुला चार कुंडें; स्थळाचें
पडे तेज नामी. असें हें स्वरूप
दिसे; बाळ तेथेंचि आजी समीप

बसे; तो शिवाजी सुशोभे मनोज्ञ;
घरीं कांति दाटे; रमे राज सुज्ञ.
गमे त्या सुमातेस संतोष मोठा.
जशी रान पक्षीण बांधी घरोटा
बहू उंच जागीं; जिथें डोंगराचा
कडा भेगळे, जोर त्या पारध्यांचा
खुटे, तेथ पिल्लें तिचीं वाढतात.
उडों लागतीं, तों झुले ती मनांत.
तिच्या भोंवतीं, तीं उडचा मारतात
पुढें सर्व चूं चूं असें बोलतात.
असी शोभली ती सुमाताहि भारी;
पुढें बाळ नाचे; मिठी तीस मारी;
पळे; खेळ मांडी; दडे; गोड चाळे
करी; तों सती ती सुखीं फार लोळे.
पुढें ती शिवाजीस माता ह्मणाली:---
"उठीं जेव; बाबा! किती रात्र झाली!

तुला भूक लागे, कशाला उशीर?
रडे शंभु, कांहीं धरीनाचि धीर."

प्रजेनें कसे सोहळे आज केले,
स्वमातेस सांगे; मनीं फार डोले:---
"मला आज भेटे सखा रावजी कीं;
महा शूर जो मोलना म्लेंछ[1] जिकी;
मला आग्रहें फार नेलें घराला.
नको बोलवेना अशा ह्या विराला.
तिथें जेवतां जेवतां तृप्त झालों.
पुढें आग्रहाला, मनीं फार भ्यालों.
किती स्वच्छ पाणी! किती गोड पोळी!
कढी छान साधे; किती गोड केळीं!
मुळीं भूक नाहीं मला आज. आले
बहिर्जी. बरें! ठीक! उत्कृष्ट झालें."

---

१ मुसलमान सरदार.

दिसे ठेंगणी मूर्ति, ही बावळीशी;
बहू शक्ति पायांत; हिंडे स्वदेशीं;
असे रुंद छाती; खरे गोल दंड;
भरे जोर अंगांत, तक्का उदंड;
जरी मानिती लोक हें रूप भोळें,
तरी न्हाळती शत्रु हे तीव्र डोळे.
हुशारींत ऐसा नसे अन्य कोणी,
निघे, दौड चाले, जसें काय पाणी.
कळे सर्व ज्याला. कुठें काय चाले;
कुठे बैसला कोण; तो काय बोले.
घडे शत्रु लोकांत ज्याचा प्रवेश.
करी रोज जो पाहिजे तोहि वेष.
कधीं लांब दाढी, सजे वृद्ध काजी;
कधीं घाण वस्त्रें, दिसे पूर्ण पाजी;
गळां जानवें शुभ्र हा वीर घाली,
करीं दर्भ, पंचांग, स्वारी निघाली.

कळे काय जें त्यास, तें सर्व आणी.
गमे थोर राजास हा सत्य खाणी.
मिळे सर्व रंगा सवें स्वच्छ पाणी;
तसा हा मिळे. दुष्ट लोकांस जाणी.
घडे वास त्या नारदा तीन लोकीं,
सदा स्वर्ग, पाताळ, मृत्यू विलोकी.
विण्यानें सुगीतें अलापीत चाले.
जिथें इंद्र शोभे, तिथें नृत्य तालें
करी. स्वर्ग सोडून पृथ्वीस येतो.
हवेंतून खालीं महाधांव घेतो,
तुटे जेविं तारा, नभीं चक्र होतें,
पडे तेज त्या नारदाचें असें तें.
कधीं चालतां, पोंचतो सूर्य लोकीं.
कधीं आड वाटें, फिरे स्वर्गलोकीं.
दिसे मार्ग ज्याला नभांतून पार,
कुठें खोल आहे; कुठें उंच फार.

जसें डोंगरी रान ह्या मृत्युलोकीं,
तसें सर्व कांहीं, असे स्वर्गलोकीं.
कुठें ओघळीच्या दऱ्या आड येती,
कुठें घट्ट रस्ता, कुठें धूळ माती.
खळाळे जळाची नदी थोर कोठें.
कुठें दैत्य राहे, कुठें देव मोठे.
असा हा बहिर्जी फिरे सर्व देशीं,
कशाचा पन्हाळा! बघो थोर काशीं.
पुढें तो ह्मणाला शिवाजी नृपाला:—

" महाराज वाटे जसें आपणाला,
तसी आज आज्ञा मला खास व्हावी.
कथाया सुवार्ताहि आज्ञा मिळावी.
बहू भागलों आज हिंडून लोकीं.
मुसल्मान कंपूंत त्या पोंचलों कीं.
तिथें थोर दर्बार दृष्टी पडे तें,

जिथें म्लेंछ सर्दार उम्राव होते.
छतीं त्या चकाकीत किनूखाब लागे,
मऊ बैठका शोभल्या छान रंगें.
मधें बैसला उंच जोहारखान.
सवें शोभला पुत्र आजीजखान.
मेरे जो अझुल्ला, महादुष्ट साचा,
बसे बाजुला फाजिला पुत्र त्याचा.
किती एक मिर्जा, महासैद होते,
गुलेना, फदूना, जमाना, असे ते.
जसा थोर हत्ती, तसा म्लेंछ डोले.
'अहो शूर सर्दार' जोहार बोले,
'अहो थोर उम्राव! गेलों फसून.
पडे काय किल्ला? असें हें बसून.
चला शौर्य दावूं; मराठ्यांस जिंकूं;
धरा जोर कांहीं, पुरे आज कांकूं.
पहा! सत्य बोले सदाही कुराण.

तसे सर्व चालूं, करूं या दणाण.
दगेबाज होतां, करूं फार तोटा.
हणूं आज बंदूक, मारूं झपाटा.,

रुचेना असा बेत त्या फाजिलाला.
महागर्व त्याला, मनीं फार भ्याला.
दिसे घोर संताप त्याच्या कपाळीं.
दगा, सूड, हेवा, वसे क्रूर डोळीं.
पुढें त्रासला तो, दिला हा जबाब;
'हणूं आज बंदूक, खाणें कबाब
नसे, मेजवानी नव्हे, हे मराठे.
जसे शूर, तैसे महाक्रूर, खोटे.
दगा, युक्ति, चाले, दुजे सर्व वाया,
करा युक्ति कीं कैद राजा कराया.,
मनीं कोपतां सुज्ञ जोहार बोले:---
'अरे! युक्ति ऐसी रणीं काय चाले?
शिवाजी असे एकटा कोण मोठा ?

जमे आज किल्ल्यांत सारा मराठा.
जरी एकटा कैद झाला शिवाजी,
तरी युद्ध संपेल ! आहेत गाजी
मराठे. करूं आज बीमोड त्यांचा.
दुजी युक्ति नाहीं. धरा मार्ग साचा.
जेव्हां मराठे पडतील सर्व,
तेव्हां मनांतील हटेल गर्व,
तेव्हां खऱ्या त्या शरणागताला
दावूं दया; हेंचि रुचे मनाला.'

असें बोलला; थांबला; सर्व झाले
मनीं फारसे खूश. सारे निघाले
लढायास, किल्ल्यावरी ह्या चढाया,
मराया, रणीं शौर्यही गाजवाया.
पुढें संपलें सर्व दर्बार. गेलों
महाम्लेंच्छ सेनेंत; मनीं दंग झालों.
शिपायी हजारों हजारोंचि येती;

भरे सर्व मैदान; वाहे नदी ती
जिथें पंचगंगा, तिथें म्लेंछ आहे.
वडिंग्यांत आहे; जिथें तेथ राहे.
दिसे पायथीं म्लेंछ, किल्ल्यास गांठी,
करी दूर कोल्हापुरीं फार दाटी.
जमे तो हजारों हजारोंचि ~~थोडा~~; घोडा
गमे तो मला लाख, थोड्यांत थोडा.
दिल्या कोण लावून रांगीहि रांगी !
जशीं कां मळ्यांतील आहेत वांगीं.
तिथें रीघ होणेंहि भारी कठीण.
उभा तो पहारा. शिरे आंत कोण?
किती लांब माना ! जणों कां कमाना;
बहू जोर ज्यांना असे उंट नाना.
उभे उंट; पाठीस जेजाल आहे;
मुसल्मानसेना महागर्व वाहे.
तिथें मांडती म्लेंछ तो तोफखाना;

किती लाविती तें, अनाना तनाना !
ढिगारा दिसे एक, गोळे किती ते !
किती बांधले बाण वेळूस होते!
तिथें लागला कोण बाजार मोठा !
खपे अन्न भारी; नफा काय तोटा !
ढिला म्लेंछ हा ! सर्व कामें ढिलीं हीं!
जिमेदार त्या देखरेखेस नाहीं.

कुणी बैसले स्वस्थ हातांत हुक्का;
कुणी लोळती छान देऊन तक्क्या.
अस्ताव्यस्ततो म्लेंछ सारा असा कीं,
ना बंदोबस्ती; ना पुरा बेत लोकीं.
जेव्हां गेलों मी, आंत सेना पहाया,
तेव्हां योद्धा हें एक लागे ह्मणाया:—
'शिवाजी मराठा मऊ आज आला;
मिळे आमच्या खास हातांत किल्ला.
पुरें युद्ध झालें; मराठेचि भ्याले;

खरे आज गाजी मुसल्मान झाले;
उठे गप्प ही; सर्व सेनेंत फांके.
फुगों लागती ते मनीं वीर बाके.
जलें रानटाकें भरे गच्च, तुंबे;
फुटे कांठ; लोंडा निघे; तो तुडुंबे.
असा गर्व मोठा जनीं म्लेंच्छ चाले.
पुरें युद्ध झालें; पुरे कष्ट झाले.
सुखें फार ते वीर भोगूं निघाले.
धरीनात कोणीहि हातांत भाले.
पुढें वाजवी म्लेंच्छ कोणी तुतारी.
तसे ते निघाले कराया तयारी.
मनीं कावरे बावरे फार झाले.
सुखें भोगतां, हें कसें विघ्न आलें!
उठे गप्प ही म्लेंच्छ लोकांत येतो
शिवाजी मराठा; भितो; राज्य देतो.
जनीं हें पिके; भेट घेणार खान;

निघे हात बांधून, देण्यास मान,
शिवाजी मराठा. तसें धैर्य आलें.
पळे भीति त्यांची; महाकार्य झालें.
पुन्हा लागले ते करायास मौजा;
सुचे तो पुलावा; रुचे भक्ष ताजा."

असें बोलतां, थांबवी त्या शिवाजी,
जरा त्रासला तो, जरा होय राजी.
ह्मणे तो " महा म्लेंछ केळींचि खाया
निघे; तीं न सोली, सुजे कोण द्याया?
असी वासना दुष्ट होणें चि नाहीं.
नमे हा मराठा! नव्हे हा शिपाई!
हणी गप्प फौजेंत सर्दार खान;
रिकामा मिळाया स्वलोकांत मान.
मराठा स्वतां आज देणार किल्ला!
नमे हा मराठा करायास सल्ला!

तरी सर्व खोटें; भुले म्लेंछ व्यर्थ.
न जाणें कुणाशीं लढे तो, किमर्थ.
तरी गांठ आहे मराठ्या जनाशीं.
कुटूं शत्रु; जिंकूं; करूं आज राशी
धडांच्या मुसल्मान युद्धीं. भितो कां
लढाया? रणीं दाखवूं म्लेंछ लोकां.
नव्हे गर्व कांहीं; नव्हे ही बढाई;
नव्हे लोभ; जो चालवी ही लढाई.
स्वदेशाभिमानें, दिला आज माना.
रुचे हाचि कित्ता मराठ्यां जनांना.
जरी सर्व खोटें मुसल्मान बोले;
जरी व्यर्थ गर्वें मनीं फार डोले;
तरी गोष्ट ही तूं खरीशीच मान;
उद्यां तो मला भेट देणार खान.
दमे तो. थके तो. भितो तो. मराठा
सले; जेविं नाजूक पायांत कांटा.

ह्मणे तो; कसा हीं निघो आज. पाय
न देतो, उठाया, बसाया. उपाय
दुजा काय आहे? मराठ्यां विरांना,
ह्मणे, चाळवूं. ह्या नको शौर्य ताना.
घडे भेट माझी हि त्याची उद्यां कीं.
बघूं राहिलासे किती जोर बाकीं."

मधें थांबला हा महाराज. झाला
पुढें तो जनू; सुज्ञ कार्कून आला;
वदे माहिती, जासुदांनीं दिलेली;
करीं पांच पत्रें धरी जीं मिळालीं.
पागोटें घाली धाकटें, चार पट्ट्या
साध्याशा; कामें जो कराया झपाट्या;
ज्याच्या कानीं ती लेखणी; तीव्र बुद्धी
ज्याची; बांधी जो शूर तर्वार युद्धीं.
लिही सर्व कांहीं, जणों चित्रगुप्त;

कळे गोष्ट जी जी, तिला फार गुप्त,
सदा राखितो; तो स्वदेशाभिमानी
सदाही जनोबास त्या सत्य मानी.
पुढें हा जनोबा कळायास बोलेः--

" महाराज! जासूद आहेत आले,
खरे धाडले जे, मराठ्या विरांनीं;
खऱ्या चोरवाटें, फळें खात रानीं
निघाले. न भ्याले मुसल्मान लोकां.
सुचे मार्ग ज्यांना वनांतून पक्का.
लिही उत्तरें सर्व सर्दार; राजा !
'रणीं गाजवाया चमत्कार, मौजा
कराया, सदा सिद्ध आहोंत योद्धे.
नको भीति; चिंता नको; वीर युद्धें
सुखी फार होतात. आज्ञेप्रमाणें
सदा सर्व आह्मास येणें हि जाणें.
निघालों. जरी दूर आहे पन्हाळा,

तरी त्यास गांठूं. पुरे रात्र. ताळा
पटे. रान कीं डोंगरांना उलंघूं;
चलूं; अन्न पाण्याविना काय लंघूं ?
हटे तो फतेखान. ते पंत येती.
अबाते निवाले, सुकल्याण हातीं
मराठ्या विरांच्या. महाराज ! गेला
दिवा; राव बाजी पडे. शत्रु मेला.
निघे पंत तो; मावळीं कीर्ति झाली;
खरी म्लेंच्छसत्ता तिथें ती बुडाली.
मिळावी, महाराज ! आज्ञा विरांना.
कुठें सर्व यावे ? कळो जासुदांना."

जरी कार्कुनानें खऱ्या कार्कुनीला
कराया, मधें घातला शब्द गेला;
तरी गोष्ट लागे नृपाच्या मनाला;
महाशूर योद्धा महामित्र गेला.

शिवाजी उभा स्तब्ध; डोळ्यांत पाणी;
करी हात खालीं; मनीं मृत्यु आणी;
महापाश त्याचे; सर्व दूत येती;
पुढें राव घालून, ते दूत नेती.
जरा थोर डोकें; मिशा फार बांक्या;
जरा उग्र डोळे; दिसे लांबनाक्या;
गडी उंच धिप्पाड; खंबीर बांधा;
सदा मान ताठे; बहु रुंद खांदा;
शरीरीं असे पीळ; ते पुष्ट दंड;
घटे हात; काढी बहु चक्रदंड.
लढाया हणाया पुढें शूर चाले;
जुमानी न सोटा, न तर्वार, भाले.
पडे वीर ऐसा; स्वशत्रूस मारी.
रडे शूर राजा; रुचे मित्र भारी.
जसा पुंड हत्ती, निघे, रान हिंडे;
झुले, दांत लावी, धरी बुंध सोंडें;

महावृक्ष मोडी; हणी श्वापदांला;
पदीं तीक्ष्ण कांटा शिरे; त्रास झाला;
मनीं चर्र झालें; भरे कंप अंगीं;
शिरीं दुःख झोंबे; बसे तो प्रसंगीं.
असें दुःख झालें मनीं त्या नृपाला;
ह्मणे तो पुन्हा "राव! कां राव गेला!
अहो राव! नाहीं लढायास भ्याला.
मिळो स्वर्ग आतां. करा, हो! तपाला
असें पाहतो, तों करूं दुःख लागे
जनोबाहि; त्याच्या मनीं प्रीति वागे.
असें देखतां, दुःख राणीस झालें;
सुमाता पुसे "काय;" तों बाळ भ्यालें.

पुढें तो शिवाजी ह्मणालाः---"पहा हें.
विरांनीं मरावें रणीं; योग्य आहे.
पडे राव बाजी. पडो वीर सारा.
स्वदेशीं झडावा मराठा नगारा.

पढायास आह्मी, चला, सिद्ध आहों.
मुसल्मान जाती, असें युद्ध हो! हो.
जनोबा! ह्मणा जासुदांना, असें हें,
उद्यां थोर दर्बार होणार आहे.
जिथें खोल त्या ओघळी; रान दाटे;
जिथें मार्ग नाहीं, विना चोर वाटे;
जिथें उंच झाडें; जिथें गोड लागे
मला, हो! बसाया; जिथें चित्त रंगे;
तिथें वीर लोकांस येण्यास सांगा;
असे तेथ दर्बार होण्यास जागा.
तिथें सर्व यावे सकाळीं उद्यां कीं.
करा आज ताकीद किल्ल्यांत लोकीं.
हुशारी करा; शत्रु भारी झटे हा.
उशालाचि तर्वार ठेवून राहा.
न जाणों चढे जोर वैऱ्यांस कांहीं;
तयारी कराया तरी वेळ नाहीं.
दिली भाकरी जासुदांना! चला, 'जा'

ह्मणा. वेळ नाहीं. करा आज काजा.
निजा, जा! जनोबा! असे काम भारी.
निजा जा, बहिर्जी, उद्यांची तयारी."

जसा थांबला, तों दिसे गोड राणी;
अती शोभलें तें मुखांतील पाणी.
निजाया निघालाहि राजा मनोज्ञ.
सवें बाळ तें शंभु; माताहि सुज्ञ
उठे. तों शिवाजी धरी पाय घट्ट.
ह्मणाली सुमाताः—"पुरो सर्व हट्ट
तुझा. हो चिरंजीव! माझ्या सख्यारे!"
पुढें शंभुला चुंबितां दुःख सारें
नृपाचें निवालें; महानंद झाला.
उसें ढाल; बाजूस तर्वार, भाला;
कसी घट्ट काच्यास; चिलूखात अंगीं;
निजे शूर राजा असा ह्या प्रसंगीं.

भाग दुसरा समाप्त.

## भाग तिसरा.

पुरी रात्र झाली. दिसे शांत सारें.
अभाळीं सुशोभा खुले; सर्व तारे
पुढें धावती; तों सुटे तीक्ष्ण वारा.
जणों तोफगोळा, तुटे लाल तारा.
पन्हाळा घुमे; पायथीं वीर होते.
उठूं लागले ते महायुद्धकर्ते.
दिसों लागती सर्व झाडें वनांत.
हळूं नाद येतो; न लागेचि अंत.

नेताजी झाला सिद्ध, बांधून फेटा;
तो घेतो हातीं, तीक्ष्ण भाला सपाटा;
बांधी कंबरेला चक्क तर्वार; मागें
पाठीला टांगी ढाल, जी फार रंगे.
हणी धूम, चाले, जसा वायु वाहे;
भरे जोर अंगांत, रानांत राहे;

नसे ठेंगणा तो, नसे उंच भारी;
जरा रोडका, देशकैवारधारी.
असे रुंद जबडा, दिसे क्रूर तोंडीं;
मिशा लांब त्याच्या; खिळे शौर्य हाडीं;
दिसे फार भेसूर, डोळ्यांत लाली.
जराशी करी सर्व कामीं जलाली.
उठे, चालला तो जिथें स्वार होते;
स्वतां ठेविलें जीन घोड्यावरी तें.
चढे, शूर तेजीस मांड्यांत दाबी;
उडे, फुर्फुरे मस्त घोडा अरब्बी.

पठाणें कुणी आणला एक घोडा
विकाया. विजापूरचा राजवाडा
कुणी त्यास दावी. तिथें पोंचला तो.
पुढें देखती लोक घोड्यास; होतो
खरा हा चमत्कार त्या म्लेंछ लोकीं,

पडे तेज; तें म्लेंच्छ सारा अवांकी.
असे लांब शेंपूट; तो थोर गोंडा.
उठे रंग जर्दा, नसे ज्यास जोडा.
किती उंच पाठाळ! आयाळ दाटे.
उभे कान. पायांत सामर्थ्य मोठें.
अझुल्ला विरानें दिलें द्रव्य. तोडा
भरे; घेतला हा महाशूर घोडा.
मरे तो अझुल्ला. मिळे हा मराठ्यां.
निघे स्वार होऊन, योद्धा झपाट्या.
करी चौकशी, सर्व स्वारांस पाही.
जमे झुंड, आहेत घोडे, शिपाई.

जिथें चालतो ओघ गोदावरीचा;
जिथें रान मोठें हि वागा बगीचा;
तिथें वाढतो छान घोडा जलाल;
चढे डोंगरी हा; न चाले मजाल

कुणाचीहि ज्याच्या पुढें, हा निघाला;
चढे स्वार, हातांत घेऊन भाला.
खळाळे महापात्र, ती मांड वाहे;
तिच्या त्या प्रदेशीं, बहू रान आहे;
जिथें वाढतो तीक्ष्ण घोडा हि जंगी,
पुढें दौड मारी, बहू त्वेष अंगीं.
निघाला रणीं नीट, हा स्वार झाला,
असे ढाल पाठीस, हातांत भाला.
जिथें माळरानें; जिथें फार गोटे;
जिथें पात्र चाले निरेचें झपाटें.
असे ओढ पाण्यास; भोरा जळाचा
फिरों लागतो; शूर घोडा विराचा
मिळे तेथ. चाले रणीं, हा सरारे,
भरे सर्व अंगीं खरें युद्धवारें.
महाचंद्रभागा जिथें चालती ती;
जिथें ढंग आहेत; तेथील येती

रणीं शूर घोडे. उभे सर्व. झाली
तयारी कडीकोट. स्वारी निघाली.

किती ते शिलेदार, ते बारगीर,
निघाले लढाया, धरीनात धीर.
मध्यें सर्वांच्या, तो सुभेदार चाले,
तों त्याच्या मागें, ते हजारी निघाले.
बाजू स्वारांची तो जिमेदार पाळी.
चौकी घस्थेची, वीर देतात पाळी.

आला नेताजी, खूश झाला मनीं तो.
घोडा दौडी, तो सर्व घोडे पहातो.
कोठें थांबे, तो काढतो चूक, चाले;
साऱ्या सेनेला, जोर देऊन बोले:--

" हा! वीर! योद्धे! तजवीज राखा.

तो शत्रु भेटेल रणांत, देखा.
आतां तुह्माला नलगे वदाया,
पक्कया तुह्माला कळती लढाया.
कसे सर्व घोडे मिळाले, पहाहे.
कसे शत्रु आहेत ठाऊक आहे.
मरे तो अझुल्ला; तुह्मी शूर आहां.
हटे म्लेंछ मागें; मनीं स्वस्थ राहां.
चित्तांत किंतू अगदीं न आणां.
भाला ह्मणां. म्लेंछ मरेल जाणां.
धांवा. चला. या. अवकाश नाहीं.
शत्रूंस मारा; वचकूं न कांहीं.
घोड्यांस दाबा. जलदी करा कीं.
मारा; करा धांदल दुष्ट लोकीं.
भाला धरा हा मजबूत बांका.
म्लेंछांस गांठून रणांत ठोका."

नसे थांबला तों, उठे स्वार सारा;

करीं लांब भाल्यास पेलीं भरारा.
दुपायीं, उपायीं, उडे सर्व घोडा.
चकाके मराठा बहादूर झेंडा.
आला तान्हाजी, थोर सर्दार शूर.
तो घेतो भाला लांब हातीं; हुशार.
त्याची छाती ती रुंद बाहेर येती.
त्याचे डोळे ते थोर, ढाळे सुकांति.
मिशा फार तेड्या; दिसे शूर तोंड;
असे उंच बांधा; बहू लठ दंड.
निघे माड जैसा, तसे पाय याचे.
बसे शूर घोड्यावरी; या विराचें
महा शौर्य गाजे, रणीं म्लेंछ लोकीं;
हणी फार भाले; मुसल्मान ठोकी.
धरी तो शिवाजी अझुल्ला विराला,
रणीं हा, कराया चुराडा, निघाला.
सदा शूर तर्वार कंब्रेस बांधी;

जपी खूप साधावया छान संधी.
सर्वे चालती झुंड. आले शिपाई
पन्हाळ्यास सोडून; खालीं लढाई.
ते मावळी, हेठकरी निघाले.
तो मांग, खेरेंच करांत चाले.
ते सर्व आले बहु तीर वाले.
ते शूद्र भीमाथडचे मिळाले.
चाले तान्हाजी, सर्व कंपूस देखी.
बेतानें मोठ्या, चौकशी फार राखी.
तो पाही त्यांची जी कवाइत चाले-
तो देखे त्याची सर्व तर्वार; बोलेः---

"हे मावळी! हेठकरी! अहो! हो!
बांधून कंपू, जय ही खरा हो.
हा शत्रु दे त्रास बहू जनांला,
धावां. चलां, हो! उठवां मनाला."

असें बोलतो, तों न बोलूंचि देती.
स्फुरे फार ताकीद त्यांच्या मनीं ती.
शिवाजी नृपाचे महाशूर बोल
मनीं वागती; बोलला राय काल.
तर्वार उपसोन तयार झाले.
तर्वार पेलीत रणीं निघाले.
हर् हर् महादेव तिथें उडाला.
रानांत त्याचा पडसाद गेला.

नेताजी आला, त्यास भेटावयाला.
तान्हाजीला ह्या, फार संतोष झाला.
नेताजी पाही शूर घोड्यास; डोले.
तान्हाजी तेव्हां, त्यास वांकून बोले:—

"हे! शूर मित्रा! बहु रामराम!
ठाऊक योजी मन काय काम.

गाठूं, चला! म्लेंछ रणांत आज.
झाली तयारी करण्यास काज.
चला! स्वस्थ चित्तें कुटूं म्लेंछ मित्रा.
सुचे युक्ति जी, ती पहा तूं हि मित्रा.
चला! आज दोघें धरूं दोन बाजू.
महादुष्ट शत्रूंस पाणीचि पाजूं.
हणा दूर घोडे. धरा तोंड तेथें;
असे तोफखाना; बहू स्वार जेथें.
सजे मावळी, तोंड एथें धराया;
अर्धी चट्ट ती म्लेंछसेना कराया.
पळा दूर खालीं नदी जेथ वाहे;
घुसा आंत तेथें, जिथें खान आहे.
कधीं म्लेंछ येऊन पाठीस लागे;
इथें सिद्ध आहों, पहा! सर्व मागें.
फिरे म्लेंछ, आह्मास एथेंचि गांठी;
मिळे ही तुह्मांला खरी संधि मोठी.

दमो म्लेंछ! त्याचीं धरूं दोन तोंडें.
पुढें घाबरो तो! जसा प्राण कोंडे."

तान्हाजी देखे; कायते नेत्र? तारे.
नेताजी दंगे, ऐकतां बोल सारे.
खिखाळे घोडा; स्वार उचलोन अंग,
बोलेः--"होतो, हां! हा! रणीं आज रंग,
सख्या! शूर मित्रा! मनीं एक किंतू
उठे. काढ तो. शक्त आहेस रे तूं.
रणीं आमची कां फुटाफूट झाली;
खरा म्लेंछ आह्मास खड्ड्यांत घाली.
चढे जोर दोघां, इथें भांडतांना.
फुटे फौज तेव्हां, उणा जोर माना.
करूं एक ठायीं, पहा! सैन्य मोठें.
ह्मणां, जें तुह्माला मनीं योग्य वाटे."

तान्हाजी बोलेः--- "जोर येतोहि जातो.
भ्याला कोणी कीं पाय मागेंचि घेतो.
आला वैरी; तो गांठतो एक बाजू;
दोघां बैलानां, रे! कधीं तें नडे जूं.
जरी फायदा सारखा कीं दिसे हा;
तरी युक्ति माझीच ऐकून पाहा.
फसे शत्रु धांवे तुझ्या आज मागें.
घडे फायदा फार; हें चित्त सांगे"

असें बोलला; तों झडे रामराम.
निघे सैन्य, चाले करायास काम.
निघे सर्व घोडा, धरी एक अंग.
निघे मावळी; म्लेंछ होतात दंग.

कुणी हेर आला भरे त्यास धाप;
पळे फार वेगें; जसा काय साप.

तिथें पोंचला हा, निजे खान जेथें.
जळे छान हंडी; सुटे वास तेथें;
पडे गालिच्या; तो सजे सर्व डेरा.
फिरे तो शिपाई, करी जो पहारा.
शिरे हेर; तेव्हां उठे खान मोठा.
पुशी लाल डोळे; निजेचा लपेटा
चढे त्यावरी फारसा. तो चपापे.
पुढें हेर देखी; मनीं फार कांपे.
कपाळास आंठ्या; सुटे पोट मोठें.
बहू केस त्याला; शिरीं गुंफ खेटे.
पडे त्यांत टोपी इराणी तऱ्हेची.
जरा नाक आंखूड. त्या भोंवयांची
खुबीदारसी ठेव. डोळ्यांत सुर्मा.
दिसे चापठा चेहरा, त्यांत सुर्मा
उठे फार पूर्वीं; दिसे खूण आतां.
उरीं लोळती लांब दाढी हि. होता

मुखीं डाग काळा. असा खान बोले:—
"असा घाबरा कां? अरे काय झालें?
तुला कोण मारी? कुणी बंड केलें?
कुठें झुंड आली? मराठे निघाले?"

मनीं भीति त्याच्या; खरें चित्त पोळे;
भरे कापरें; तो हळू हेर बोले:—
" मराठे! मराठे! मिळाले मराठे.
तयारींत आहेत ते आज, वाटे.
दिवे ते हजारों. हजारोंचि घोडा.
हजारों शिपाई. घुमे रान. वेडा
मनीं मीच देखून झालों; पळालों.
मराठा ह्णी तीर. मी फार भ्यालों.

दुजा हेर आला; शिरे आंत; बोले:—
" पहा! हे मराठे! मराठे निघाले.

हजारों मराठे! हजारों हि भाले!
किती बंदुकी त्या! किती तीरवाले!"

असें ऐकतां, खान बाहेर चाले.
पुरी बुद्धि गुंगे. महादुःख झालें.
निजे सर्व सेना. कशाची तयारी ?
चढे फेस तोंडास. आली भिरीरी.
तसा, तोच पोषाख; चाले पहाया
कुठे फाजिला तो निजे. कष्ट वाया.
नसे फाजिला. तो रिकामाचि डेरा.
पडे व्यर्थ खानास फौजेंत फेरा.
कनातीपशीं हा उभा खान राहे.
दुणें दुःख झालें, नसे फाजिला; हें
मनीं आणतां त्यास आश्चर्य झालें.
स्वतांशीं स्वतां तो असे शब्द बोले:—

"खुदा थोर आहे. दिसे विघ्न मोठें.
अकस्मातृचि आले मराठे झपाटे.
नसे फाजिला, युक्ति कांहीं कराया.
करूं काय आतां महामूद राया?
मुसल्मानधर्मास ही कीड लागे.
मराठे सदा सर्व आहेत मागें.
लाल्लाह् इलल्लाह महमद् रसूल
अल्लाह्. अरे धांव. खुदा! हशील
युद्धीं नसे ह्या. मज कोण तारी?
रे धांव! अल्लाह् तुज शक्ति सारी."

निघे थांग लावावया फाजिलाचा;
शिपाई उठे शब्द ऐकून त्याचा.
पडे धूड कोणी, जिथें वाट होती;
निजे स्वस्थ, घेऊन तर्वार हातीं.
असा हा शिपाई! कशाचा पहारा!

मनीं खान लाजे. निघे तो झरारा.
कुणी चोर फौजेंत धुंडीत चाले;
दिसे खान साहेब! तों चिप्प झालें.
पुढें चालतां, खान तंबूस गांठी;
जिथें छान आरास पाहून, पोटीं
महाश्चर्य झालें. शिरे आंत जेव्हां,
जळे चित्त, मागें फिरे खान तेव्हां.

इथें फाजिला बैसला. मौज चाले.
बसे नूरजानी, हणी इष्कभाले.
करीं छान वीणा; चढे तान गातां.
झुले फाजिला; रूप नामी पहातां.
मोठें तिचें तें सुकुमार अंग;
ज्याची किती छान खुमास! रंग
हा देखतां खास लपेल रंभा
ती मेनका. कोण चढे सुशोभा!

फिरविले उलटे वर सोज्वळ
सडक केस तिणें. सडपातळ
तनु. हिरा चमके वरती शिरीं;
बिजवरा जणुं बिंदि धरी परी.
तिचे मोकळे केस; ती पाठ साजे.
तिळानें तिचा गाल डावा विराजे.
पडे छान गालीं खळी. शुभ्र दांत.
गळा काय गोरा! दिसे पिंक त्यांत.
ही शिर्कदेशीं मुलगी निघाली.
होता तिचा बापहि भाग्यशाली.
हें रूप लावण्य जनांत गाजे;
तों इस्पहानांत अमीर माजे.
राजा तिला हा पकडून आणी;
ठेवी जनान्यांत विलासखाणी.
तेथून कोणी पळवून नेली.

---

१. गांवाचें नांव.

ती थेट दिल्ली शहरास आली.
तिथें फार भोगी सुखें; स्वस्थ राहे;
तिचा यार प्यारा; तिला सर्व आहे.
पुढें दुष्ट दैवें चमत्कार केला.
जिवाचा धनी तो तिचा गप्प झाला.
तिथें तों पडे गांठ ह्या फाजिलाची;
निवाली तिच्या सर्व दुःखें मनाचीं.
जडे चित्त, ती तेथ राहे खुशाल.
रुचे फाजिला हा, विरांतील लाल;
भरे सर्व त्याच्या शरीरांत तान.
उमेदींत आला खरा हा जवान,
शिरीं भांग काढी; जुळी केस सारे.
मुखीं तेज फांके; सुटे फार वारें
सुखें भोगण्याचें मनीं. शौक भारी.
असे बुद्धि थोडी, उड्या फार मारी.
सदा शूर तर्वार कंब्रेस मोठी;

तरी लागतो गोड शृंगार पोटीं.
घाली गळां हार नव्या फुलांचा.
पोषाक त्याचा अलबेल साचा.
हातीं धरी तो गजरा. मनांत
मानी सुखें तो विचकून दांत.

उभा खान बाहेर; चित्तांत लाजे;
महा दुःख ज्याच्या मनीं खास माजे;
ह्मणे:—"फाजिला! फाजिला! शत्रु आला!
मुसल्मान लोकांस ठोकूं निघाला."

जसा फाजिला हा चपापे; उठे कीं;
तसी नूरजानी सख्याला विलोकी;
धरी हात त्याचा; करी खूण दयाला.
निघे शूर; झाडी तिच्या त्या कराला.

पुढें खान भेटे; हळूं त्यास बोले:—
" अरे फाजिला! हें महाविघ्न आलें.
मराठे मिळाले! मराठे निघाले.
सर्वं बंदुकी, तीक्ष्ण तर्वार, भाले.
सुचे काय जी युक्ति ती सांग. पाहा!
तयारी नसे आमची; शत्रु हां हां
ह्मणों, तों लुटालूट जातो करून;
हणी बंदुकी, द्वाड कंपू रचून.
पहा! हेर हे सांगती काय गोष्ट.
निघाले मराठे. कशी काय वाट?
तयारीहि कट्टा कराया मराठे
पहा! लागले, रात्र जाणून, हट्टें.
अर्धी सिद्ध होता, घडे कार्य मोठें.
मिळे वेळ तेव्हां चढे जोर, वाटे.
करूं युद्ध आतां. चला कीं लढाया.
मराया, स्वधर्मास द्या गाजवाया.

असें बोलतां, खान उच्छ्वास टाकी;
पुढें धांवतां फाजिला दंड ठोकी;
मिशा सारितो ओठ चावून बोलेः—

“नको भीति आतां. इथें शौर्य चाले.
पहा! खानसाहेब! अले मराठे!
किती जोर त्यांना ! करूं युद्ध मोठें.
किती शौर्य त्यांचें! हणूं त्यांस आतां.
किती डौल त्यांचा! कळे युद्ध होतां.
कशाची तयारी! कुटायास काथा
मिळाले मराठे, हणूं त्यांस लाथा.
रणीं सिद्ध झाले मराठे लढाया!
पहा! हात हे, शूर तर्वार, योद्धा
खरा हा. चला! मी भितों काय युद्धा?
करावा दगा जेथ चाले दगा तो.
इथें घेतलें युद्ध. हा सिद्ध होतां.”

असें बोलला, धांवला कंपुमध्यें
पुढें हाक मारी :—"अहो शूर योद्धे !
चला, बेतली आज बाजू, लढाया.
उठा सिद्ध व्हां. हो! जिताया, मराया.
अरे कोण? माझा, पळा ! साज आणा.
निघा. धांव मारा, जसा कां ससाणा.

असें ऐकतां बोल, खानास वाटे,
रणीं जिंकले आज ह्यानें मराठे!
शकेनाचि कांहीं कराया इलाज!
उभा खान राहे; मनीं फार लाज.
करी युद्धपोशाक; हा खान झाला
पुरा सिद्ध; युद्धीं मराया निघाला.

पुढें तो गुलेनां तिथें धांवला ही,

१ मुसल्मान सर्दाराचें नांव.

जिवाची खरी जाय होऊन लाही;
करीं लांब तर्वार; ये त्वेष अंगीं;
सरारे रणीं हा महावीर जंगी.

तसा तो फदूना[1] निघे तांतडीनें;
करी युद्धपोशाक; डोले तमानें.
चढे थोर घोडयावरी हा निघाला.
दिसे राग डोळ्यांत; हातांत भाला.

किती गांगरे तो जमेना[1] बिचारा!
उठेना, करीनाचि कांहीं विचारा.
नसे ज्यास तर्वार कीं लांब भाला;
चढे म्लेंछ घोडयावरी; हा निघाला.
करीं लांब वेळू धरी हा जमेना
मिळेनाचि भाला हि; कांहीं जुळेना.

---

१ मुसल्मान सर्दारांचीं नांवें.

जसा खान सांगे हणाया तुतारी;
दणाणे तसी फौज; झाली तयारी.
तसे म्लेंछ घोडयावरी सिद्ध झाले.
नसे जीन कोणा; ढिला तंग चाले
कुणी; जेरबंदाविना दौड धांवे
कुणी, कीं कसेंही रणीं आज जावें.
निघे उंट; ज्याच्या वरी बाण, दारू,
भरे सर्व सामान; तें जेविं तारूं
समुद्रांत चाले, तसा उंट हाही,
जुमानी न वाळू, न रानें, न कांहीं.
जसा वायु लागे; तसी नाळ लागे.
जसी बुद्धि सांगे; तसा उंट वागे.
कुणी नाद मोठा निघाले करीत.
कुणी लांब माना, बहू डोलवीत.
कुणी बैसले ते उठेनात जेव्हां;
बहु तोडती म्लेंछ इयाइया हि तेव्हां

शिपाई निघाले, भरारा, झरारा.
असा सिद्ध झाला रणीं म्लेंछ सारा.
आले ते गोलंदाज हातांत तोडे.
गोळे, दारू ती; तोफखाना कडाडे.
घोडे त्यांचे ते सर्व रांगी जुळून
आले ह्या जागीं; कीं लढावें मिळून.
कुणी स्वार येऊन खानास सांगेः—
"निघाला मराठा; पहा आज मागें.
जियें पंचगंगा, तियें हे मराठे;
इयें हे मराठे; पहा ! रान दाटे.

तसा थोर हर्हर्महादेव झाला.
उठे घोर आवाज तो म्लेंछ भ्याला.
चढे त्वेष तों सर्व दिन्‌दिन्‌ उडाला.
निघे म्लेंछ सारा. मराठा निघाला.
गांठी मराठा; रगडा उडाला;

तर्वार चाले; रणशूर भाला
गांठून वैरी उडवीत गेला.
काहूर, काहूल, अकांत झाला.
जसी सिंधदेशीं उठे वायधूळ;
घुमे रान सारें; उडे फार धूळ;
खरी आग वर्षे; सुटे ऊन वारा;
दिशा धुंद होती; चकाचूर सारा.
तसा हा मराठा निघाला हणीत,
धरी दोन तोंडें. महाम्लेंछ त्यांत
रणीं कोंडला. दोन बाजूंस चाले
महायुद्ध. वैरी भयाभीत झाले.
जिवाच्या करारें रणीं राहिलों कीं;
दशा खान जेव्हां स्वताची विलोकी,
चढे त्वेष त्याला, पुढें वीर झाला,
हणी शूर भाला, तसा जोर आला
मुसलमान लोकांस. झाला घुराडा;

मराठा, मुसल्मान, तो स्वार, घोडा.
उठे घोर हर्हर्, उठे घोर दिन् दिन्;
उडे रक्त मध्यें; रणीं सर्व किन् किन्.
मुसल्मान लोकीं चढे जोर जेव्हां;
मराठा सरारे पुढें सर्व तेव्हां.
पडे गांठ; ये हातघाईस वीर.
मराठा रणीं फार तर्वारशूर.
तडाका हणाया, धडाका कराया,
निघाला मराठा जिताया, मराया.
रणीं युद्ध माजून फड्शा उडाला.
दमेना मराठा, महाम्लेंछ भ्याला.
पुढें ते मराठे जरा दंग झाले,
जसे हे मुसल्मान चालून आले.
पुन्हा धैर्य केलें; पुन्हा चाल केली;
पुन्हा जोर आला; पुन्हा मात झाली.
निराळे, मुसल्मान टोळ्या करून,

उभे राहिले, प्राण कंठीं धरून.
तसे धांवले हे मराठे मिळून,
पुढें दौड केली जरा सांवरून.

तों तान्हाजीच्या राग आला मनांत;
टौकारी डोळे; धांवला शूर आंत;
फोडी टोळी ती, जींत तो खान राहे;
लागे मागें जों धांवतां खान पाहे.
पुढें खान; मागें महावीर लागे,
चढे त्वेष अंगीं, मनीं राग वागे.
जियें म्लेंछ आले; मध्यें वीर आहे.
तरी हा मराठा मनीं स्वस्थ राहे.
असे धांवले एकमेका हणाया,
रणीं आपलें शौर्यही गाजवाया;
करी खान जैसा जिवाचा उपाय,
तसी फौज गाळी रणीं हातपाय.

निघाला, पळाला, भयाभीत खान;
स्वताच्या जिवाचें नसे ज्यास भान.
हणी टाच घोड्यास; तोंडास फेंस;
सुटे घाम अंगीं; लटाटा करांस
सुटे कांपरें; तों हले लांब भाला;
असा खान भारी रणीं आज भ्याला.
सरारे गुलेना धराया मराठा;
भरे शौर्य अंगीं, मनीं फार ताठा.

तेव्हां तान्हाजी त्रासला; लाल झाला;
दौडी घोड्याला तो हणायास भाला.
मागें पाठीशीं ठेपला तो गुलेना.
ज्यानें भाला तो फेकलेला कळेना.
पडे तीक्ष्ण भाला, विराच्या शरीरीं;
बघी पाठिमागें. मनाची हिरीरी
नये आवराया. महाशूर वीर

फिरे पाठिमागें; व नेमून ऊर
हणी द्वाड भाला; हटे तो गुलेना.
तुटे टांग त्याची; तरी तो बुजेना.
पुन्हा धांवला तो; पुन्हा मार खातो;
पडे खालती; प्राण तत्काळ जातो.
जसा कोंकणीं ढासळे माड तेंव्हां,
वनीं वायु चाले झपाटीत जेंव्हां.
महानाद होतो; मनुष्यें भितीं तीं;
तसा हा गुलेना पडे. फौज होती
रणीं घाबरी. खान जाया सुटून
पळे फार. तों फौज गेली गळून.
पुढें वीर भाल्यास फेंकीत चाले.
भयें खान कांपे. महा म्लेंछ भ्याले.

तिथें गांठतां, हा मराठा ह्मणाला:—
"अरे म्लेंछ! रे थांब! हा खाचि भाला.

नको घाबरूं तूं. नको गांगरूं तूं.
तुझीं सर्व दुःखें निवारील मृत्यू."
असें बोलतां बोलतां धांव केली;
हणी शूर भाल्यास; टोपी उडाली.
पडे खान खालीं; मरे थोर घोडा;
महाशब्द झाला; धडाडा! धडाडा!
घोडयास भाला कचकून लागे.
तो प्राग सोडी. रण फार रंगे.
हें रक्त प्याली रणभूमि जेव्हां,
आले मराठे समजून तेव्हां.
उठे खान उपसोन तर्वार, धांवे,
हणाया मराठा; मनीं फार कावे;
करी वार, तो सर्व गेला चुकून;
मराठा बघी, खान गेला पळून.
दडे खान कोठें, कळेना विराला.
महाम्लेंछ हा हातचा पार गेला.

जसा शूर कुत्रा शिकारी धराया
कुणी श्वापदाला, पळे फार; वाया
पुढें दौड झाली; पशू तो पळाला;
कुठें रानझाडींत तो गप्प झाला.
मनीं राग पेटे. महात्रास होतो.
पटाईत कुत्रा जळे, दांत खातो.
तसा हा मराठा रणीं आज झाला.
कळेना विराला कुठें शत्रु गेला.
निघे वीर हा शत्रु शोधावया कीं,
शिरे क्रूर फौजेंत ते म्लेंछ ठोकी.

आवाज मोठा इतक्यांत झाला.
कोणी मराठा रगडीत आला.
त्या म्लेंछ लोकां, बहुजे पळाले;
मागें मराठा बडवीत चाले.
नेताजीनें त्या पंचगंगा तटाकीं

मौजा केल्या. तो म्लेंछ तेथून हाकीं.
फडशा झाला; तो तोफखाना टिकेना.
मागें नेताजी ते पुढें म्लेंछ नाना.
सुटे वीर हा, म्लेंछ कापित चाले.
नसे शुद्ध; ते म्लेंछ मागून आले.
दणाणे खरा शत्रु, हा वीर गर्जे:--
"चला. या. हणा म्लेंछ." आवाज गाजे.
असा देखतां वीर हा, फाजिलाला
चढे त्वेष भारीच; आवेश आला.
मनीं तो ह्मणे:-- "वीर जातो पळून;
चला आज; धावून, आगूं धरून."
बसे फाजिला छान घोड्यावरी तो;
सजे म्लेंछ भारी; मनीं गर्व होतो;
करी डौल मोठा; रणीं आव घाली
शुराचा. उडे फार; स्वारी निघाली.
असे फाजिला दूर गर्दीत कोठें.

निघे म्लेंछ तेथून; ती फौज दाटे.
करी एक बाजूस सर्दार मोठे.
मधें वाट केली; जिथें स्वार खेटे.
दिसे शूर घोडा; उड्या छान मारी;
धरी मान तेढी; सुपुच्छा उभारी;
रणीं फुर्फुरे; ताठवी कान भारी.
बघूं लागली म्लेंछ हा फौज सारी.
तसा म्लेंछ धांवून आला समोर,
पिसाऱ्यास काढून तो जेवि मोर.
पुढें छान तर्वार उपसून राहे;
बुजावून बोले:--"अरे कोण आहे ?
ठाऊक नाहीं रण हें. अरे रे !
आह्मीं मुसलमान. पुरे ! पुरे ! रे !
हा मार आतां दडपून खा, या
ह्या तूप पोळ्या; सजल्यात खाया."
नेताजीला तों फार आश्चर्य झालें.

शंके चित्तीं कीं कोण हें सोंग आलें !
मोठा भाला तो शूर घाली जिनांत;
रेटी जोरानें, दाबला शत्रु त्यांत.
शंके म्लेंछ, ना शूर घोडा, हलाया.
किती तोडतो म्लेंछ झ्याझ्या सुटाया.
पुढें स्तब्ध घोडा ! पुढें स्तब्ध वाचा !
निघायास भाला, करी शत्रु पेंचा.
भाला निघेना; अडकून राहे.
घोडा हलेना; वरतीं न पाहे.
तेव्हां मराठा रगडून बोले:—
"हे शूर योद्धया! रण केविं चाले!
रे म्लेंछ सर्दार! पहा! पहा! रे!
ह्या तूप पोळया! बघ कोण हारे!
हा धडु वेळू तुजला निघेना!
रे हौस झालीचि पुरे. पुरेना!"
असें बोलतांना दिला एक रेटा,

तुटे जीन सारें तटाटां, झटाटां.
घुसे तीक्ष्ण भाला, पडे म्लेंछ खालीं.
तसी फौज सारी, रणीं दंग झाली.
उठे म्लेंछ येऊन भेटया खुटींकीं;
तमाशा खरा हा मराठा विलोकी.
मनीं म्लेंछ झाले भयाभीत सारे.
लढाई हि चाले जिवाच्या करारें.
दे हात डावा गुडघ्या वरी तो;
चावीत ओठांस उभा रहातो.
तर्वार हातीं उचलूं निघाला;
व्यापून चंद्री, पडतां लगाला:---

"अरे प्राण जातो! अरे प्राण जातो!
अरे धांव मारा, मला त्रास होतो.
नव्हे हा मराठा! कुणी भूत आहे.

खरा काळ कीं हा! नव्हे युद्ध, हा! हें."

तसे धांवती म्लेंच्छ; घेऊन जाती
तिथें फाजिलाला, जिथें मौज होती;
जिथें स्वस्थ डेऱ्यांत राहे निजून;
जिथें नूरजानी खुले, खेळवून.

नेताजीनें तों पाहिला तो पिलाजी,
माराया म्लेंच्छा चालतो वीर, गाजी,
डोक्या मध्यें जों वार लागून गेला,
त्याचा खांदा तों रक्तबंबाळ झाला.
तरी शूर चाले वधीनाचि मार्गे;
हणी ते मुसल्मान; युद्धांत रंगे.
पुढें धांव धांवून तर्वार मारी,
लढाया धजेनांत ते म्लेंच्छ वैरी;
नेताजी तेव्हां हाक मारीः---"पिलाजी!

योद्धा! रावा! रे! तूं खरा वीर, गाजी.
हा घोडा आहे, घेचि; ये; बैस हाक;
लावी झेंडा बा! दुष्ट लोकांस ठोक."
महावीर ऐकेचि ही हाक जेव्हां,
हणी धूम मोठी रणांतून तेव्हां.
धरी छान घोड्यास हातांत, पाहे,
मनीं खूश होऊन तो स्तब्ध राहे.
चढे वीर घोड्यावरी; स्वार झाला;
पुन्हा आपलें शौर्य दावूं निघाला.
हटे पाठिमागें, चमत्कार मानी;
मुसल्मान लोकां कुणी वीर तानी.
चढे शूर तट्टावरी; दौड चाले.
दिसे ठेंगणासा; सुसौंदर्य डोले.
धरी एक हातांत तर्वार वीर;
दुजा हात भाल्यास फेकी हुशार.
जसा बाण जातो, तसा वीर गेला;

मुसल्मान लोकांत दंगा उडाला.
फिरे फौज; ती एक बाजूस झाली.
तिथें हा मराठा धरी तोंड. केली
महामात; ते म्लेंछ पाडीत गेला.
हणी वीर गर्दीत तो तीरवाला.
तिथें गोफणीनें महानर्थ केला.
कुणी वीर पट्टाचि खेळूं निघाला.
ती फौज सारीहि चढून आली.
मध्यें रणीं धांदल फार झाली.
ते म्लेंछ आले उलटून तेथें,
झाडी बहू रंजक वीर जेथें.
झडे फैर मध्यें, झडे फैर अंतीं.
उडे धूळ भारी, अशा ह्या अकांतीं.
फुटे कीं चळांढी; उडे रक्त भारी;
लढे फार तो देशकैवारधारी.

पडे तो सुलेमा, महागर्व ज्याला.
विजापूर दर्बार दे मान त्याला.
पडे तो गलीठा महा दुष्ट म्लेंछ.
सदा चालवी हा रणीं पाचपेंच.
पडे औरंअल्ला[1] दिसे शूर मोठा;
न ठाऊक ज्याला मराठी झपाटा.
असे फार वाचाल गप्पांत रंगे.
महायुद्धसिंधूंत कांठीं तरंगे.
पडे गुल्लबाहार[1] उताणा रणांत;
घळाळां रडे; तीर आहे कुशींत.
पडे मल्कफत्तू[1], तुटे हात जेव्हां;
फुटे त्यास झेंडू रणीं फार तेव्हां.
किती जोर झाला; नसे हा सुमार,
धरी उंट हातीं; वहायास भार
दमेना कधींही; पिळी हा पहार;

---

१ मुसलमानांचीं नांवें.

इथें लोळतो फार खाऊन मार.
पडे शूर आतमोद[१] सिंतबूलवाला[२],
रणीं फार गर्वें लढाया निघाला.
मुसल्मान मानीचि झाला अजिंक,
रणीं आज झाला खरा दीन रंक.

मेले किती म्लेंच्छ सुमार नाहीं.
गेले मराठे वरतीहि कांहीं.
जे वीर मोठे पडले रणांत,
स्वर्गीं सदा ते वसती सुखांत.
पडे रोणजी जो हणी टांग लांब;
उभा रंगणीं जेविं खंबीर खांब.
जसा वाघ चाले, तसा शूर चाले,
हणी ते मुसल्मान जे येत गेले.

---

१ मुसल्मानाचें नांव.

२ गांवाचें नांव.

पडे राव मोग्या झगाटचा लढाया,
न भ्याला हणाया, रणीं ह्या मराया.
असे शूर तर्वार हातीं, निघाला
जुमानी न सर्दार, ना तीक्ष्ण भाला.
पडे तो तुकोजी, महाशूर वीर,
निघे सूड घ्यायास, हातीं कटार;
करी घोर युद्धांत ते शत्रु ठार,
महाक्रूर जे दुष्ट कर्मांत शूर.
पडे तो भिमाजी, महातीरवाला;
असे तीर सोडी; टिकेनाचि भाला.
टिकेना कुणीही; लढाया धजेना;
रणीं एवढी गांगरे म्लेंछसेना.
पडे तो यम्यामांग जो चार तर्फा,
हणी फार धोंडे, झडे जेविं मर्फा;
लढे पाय त्याचा; लढे हात त्याचा;
सुटे लाख धोंडा; रडे म्लेंछ साचा.

दावी पट्ट्याचे हात जो शूर युद्धीं;
जो पेली पातें झट्ट; चाले न बुद्धी;
खेळे पट्टा जो, म्लेंच्छ मारी हजार;
झाला रामोशी हा गणोजी हि ठार.

खरें नेम साधून बंदूक मारी;
असे बार काढी; मरे म्लेंच्छ भारी;
रणीं रंगता रक्त, ती फौज सारी
उगी राहली. तों पडे हा मुरारी.

पळांत हा रंग घडे; निदानीं
हटे खरा म्लेंच्छ. रणांत मानी
उभे मराठे लढणार शूर.
दडे मुसल्मान पळून दूर.

नेताजी आला, म्लेंच्छ नाहीं रणांत;
ही गर्दी झाली जेथ एके क्षणांत.
तेव्हां तान्हाजी भेटला त्यास एथें.

होता योद्धा तो पिलाजीहि तेथें.

मनीं ते ह्मणाले असा वीर कोण
रणीं आज आला; धरी चार कोण;
हणी शत्रु भारी; पुढें फौज रेटी;
धरी दोन हातांत शस्त्रें झपाटीं;
महाश्चर्य झालें, मनीं दंग झाले
महावीर हे; तर्क कांहीं न चाले.
जरी मर्द तट्टावरी स्वार झाला,
तरी शौर्य दावून जिंकूं निघाला.
पळे म्लेंच्छ सारा, पळे फौज सारी.
लढाईच मारून, झेंडा उभारी
मराठा, विरांना मुळीं काम नाहीं;
करूं युद्ध, ज्यांची असे कामना ही.
मनीं फार त्यांचा सुसंताप झाला.
असा हा मराठा रणीं कोण आला!

असे शूर योद्धे मनीं गर्क झाले.
पुढें तो पिलाजी महाशूर बोलेः--

"अहो वीरहो! शूरहो! खास झाला
चमत्कार मोठा; महावीर आला
करायास साहाय्य आह्मां विरांना;
तरी एकटा तो कुटी म्लेंछ सेना.
किती शौर्य मोठें! किती धैर्य मोठें!
धरी दोन शस्त्रें; जियें म्लेंछ खेटे,
तियें धांव केली; तियें युद्ध केलें;
निवे युद्धमैदान हें; जें भुकेलें.
नसे काम आह्मां; पुरे हा पडे कीं
मुसल्मानसेनेस; ती सर्व जिंकी.
असें हें भवानी धरी रूप, वाटे.
महाशूर ती; धूर्त ती गुप्त वाटे
निघाली लढाया; धरी दोन शस्त्रें

करीं दोन; ठावीं जिला थोर अश्वें.
पुजावें भवानीस. आहे खरी ती.
नसे मानवी कृत्य; ही देवरीती."
असें बोलतो तों बहिर्जी निघाला
रणांतून बाहेर; हातांत भाला.
उडे रक्त अंगावरी; लाल डोळे;
खऱ्या थोर युद्धांत हा वीर घोळे.

पुढें वीर त्याला पुसूं लागले कीं,
"असे वीर तो कोण, जो म्लेंछ जिंकी?
महावेग, रे! थोर धारिष्ट ज्याचें,
मुसल्मान लोकां रणीं फार चांचे.
शिरे वीर युद्धांत घेऊन तट्टू,
करी जें मुसल्मान फौजेस खट्टू."

तसा हा बहिर्जी हसूं लागला कीं,

असे सर्व ठावूक ज्याला, विलोकी
महाश्चर्य मानून त्यांना; ह्मणालाः—
"जसा घोर आवाज फौजेंत झाला;
जसा घोर हर्हर् व दिन् दिन् उडाला;
तसा नाद गर्जून किल्ल्यांत गेला.
राजा शिवाजी निजला असे तो,
तेव्हांचि जागा दचकून होतो.
राहे उभा शूर; निघे लढाया;
हातांत भाला उचली वधाया
हे म्लेंछ; आणी निवडून तट्टू,
'जें फौज टाकीचि करून खट्टू;'
तो शूर देखे, उसळे तडाका;
हर्हर् व दिन् दिन् : उठतात हांका.
कुणी पारधी ये कराया शिकार;
सवें शूर कुत्रे; वनीं त्रास फार
पशुश्वापदांना, पळूं लागतीं तीं,

उठे एक कल्होळ; आवाज होती.
जसा वाघ मोठा निजे स्वस्थ दूर
कुठें रान झाडींत, ऐकून बार
उठे; पुच्छ मारी जमीनीस; पाहे;
बहू गुर्गुरे; तोंड पिंजारतो हे;
पुढें धांव घेतो; नसे भीति ज्याला;
किती चेतवी शौर्य त्याच्या मनाला!
तसा शूर राजा उठे; हाक मारी;
सवें सर्व आली; पळे; वेग भारी;
कड्यांतून आलों दऱ्यांतून खालीं;
सुटे तीर तैसी उडी वीर घाली."

पुढें बोलतो तों महाराज आला.
रणीं रंगलें शूर तट्टू व भाला.
सुटे घाम अंगीं; स्फुरे बाहु त्याचा;
खरे उग्र डोळे; मुखीं राग साचा.
पुढें त्या विरांच्या पशीं राय चाले.

मनीं सौख्य पावून, ठासून बोले:--

" हो थोर योद्धे ! रण शूर, जंगी !
या, हो मराठे ! रणरक्त अंगीं
आहे पहा तें. सजलांत वीर
आतां खरे, हो ! पळवून दूर
त्या म्लेंछ लोकां, बहुगर्व ज्यांना,
ताठा रिकामा, मिसकीन ताना;
ठोकून बाढा, बळ दावितात;
आह्मां पुढें ते कर जोडतात.
हा आमचा देश सदाहि आहे.
पूर्वीं मराठा नृप एथ राहे.
तो भोजराजा बळवान योद्धा,
घोर सदाहि युद्धा.
वीर बांधी स्वपराक्रमानें
केले मराठे पंधरा क्रमानें.

सर्वांत पक्का रचला पन्हाळा;
योद्धे कुळांचा पहिला जिव्हाळा.
पुढें बावडा रांगणा तो सतारा
रची. वीर शोभे जसा थोर तारा.
कुळीं ह्या नृपाच्या निघाले मराठे.
तुह्मी शूर हे; वंश हा योग्य वाटे.
हो! हो! मराठे! लढणार शूर!
हें युद्ध केलेंत खरेंचि घोर,
तो म्लेंछ मागें हटवून दूर.
शाबास! शाबास! हुशार वीर!
भले हो! मराठे! महामात झाली.
मुसल्मान लोकांस ठाऊक केली,
किती शक्ति आह्मां मराठ्यांस आहे!
मुसल्मान हे चीत; मानू नकां हें
माराल युद्धें बहुघोर जेव्हां,
मागें मुसल्मान हटेल तेव्हां.

हातांत तर्वार, उभे असूं हूं;
मैदान पाहून तयार राहूं.
मुसल्मान लोकांस जो जोर आहे,
कसा मोड होईल त्याचा; पहा हें
सदा युद्धरंगीं असूं गुंग जेव्हां,
महाम्लेंछ होईल हा दंग तेव्हां."

असें बोलला तों मराठा सरारे;
धरी नग्न तर्वार हातांत. सारे
महावीर तर्वार उप्सीत गेले.
"महाराज! हे राय!" ती फौज बोले:-

"सदा सिद्ध सेवेंत आह्मीं तयार;
नको प्राण, संसार; देऊन मार
मुसल्मान लोकांस, तो स्वर्ग पाहूं;
रणीं सिद्ध तर्वार बांधून राहूं".

आवाज, हर्हर् उठला झपाटा;
तों खूश झाला सगळा मराठा.
ते वीर सारे स्वगृहा निघाले.
तों तेज फांके चमकून भाले.
जों चंद्र थोडा वरती निघाला;
तों झाक मारी बहु, भोर किल्ला.
लाली मजेची पसरून गेली.
ते जामधें धूळ तिथें उडाली.
इथें शूरसेना सुशोभून गेली.
धुळीच्या कणांची चकाकी उडाली.
धुळीच्या कणांच्या मिषानेंच झाली
खरी पुष्पवृष्टी नभांतून खालीं.
ते शूर योद्धे चढले पन्हाळा,
तों बायका त्या सजवून माळा
दारीं उभ्या. त्या नवरे गळयांत
घालून भारी फुगले मनांत.

भाग तिसरा समाप्त.